महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती गेली अनेक वर्षे अंधश्रध्दांच्या विरोधात संघर्ष आणि प्रबोधन करीत आहे. भूत, भानामती, चेटूक, चकवा, ज्योतिष, प्लँचेट या व अशा विविध अंधश्रध्दांचे मूळ 'आत्मा' ही संकल्पना आहे.

विज्ञान पूर्व काळात सृष्टीचा कार्यकारण भाव मानवाला नीट कळला नव्हता. अशा काळात निसर्गातील विविध घडामोडी, मनाचे व शरीराचे विविध आजार यांच्या पाठीमागे विविध प्रकारच्या सुष्ट व दुष्ट देवता आहेत अशी त्याची समजूत होती. विज्ञानाच्या प्रकाशात अशा प्रकारच्या विविध भ्रमांचे स्पष्टीकरण आता आपणांस मिळाले आहे.

ज्यांचे हितसंबंध विविध भ्रमावर आधारित आहेत तो पुरोहित वर्ग अंधश्रध्दांचा उपयोग करीत आहे. या उलट सत्याचा शोध घेऊन मानवी कल्याणाचा ध्यास घेतलेली विवेकशक्ती शोषणाच्या विरोधात इतिहास कालापासून संघर्ष करीत आहे.

या पुस्तकात वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित 'आत्मा' या संकल्पनेची चिकित्सा केली आहे. प्रजनन विज्ञान व भौतिक विज्ञान यांच्या प्रकाशात 'आत्मा' हे वस्तुनिष्ठ सत्य नाही असाच निष्कर्ष निघतो. अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना व सर्व सामान्य लोकांना या पुस्तकापासून नवा विचारांची प्रेरणा मिळेल.

विवेकाची साथ धरून स्वतःला व इतरांना डोळस बनविणारे हे पुस्तक प्रत्येकाच्या संग्रही हवेच.

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती



# आत्मा पुनर्जन्म प्लँचेट

प्रा. प. रा. आर्डे

25/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती-प्रकाशन

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## प्रकाशन विभाग

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत | क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| | विज्ञान बोधवाहिनी पुस्तके | | १. | वैज्ञानिक जाणीवा | ५० |
| १. | सर्पविज्ञान | १० | २. | पर्यायी उपचार की | |
| २. | मनोविकार आणि भूतबाधा | १० | | अंधश्रद्धेचा प्रचार | ४० |
| ३. | वैज्ञानिक दृष्टीकोन | १० | ३. | अंधश्रद्धेची दुनिया | |
| ४. | व्यसनमुक्ती आणि एड्स | १० | | चमत्काराची किमया-भाग १ | ४० |
| ५. | वयात येताना (मुलांसाठी) | १० | ४. | अंधश्रद्धेची दुनिया | |
| ६. | वयात येताना (मुलींसाठी) | १० | | चमत्काराची किमया-भाग २ | २५ |
| ७. | संमोहन | १० | ५. | संमोहन | १५ |
| ८. | आत्मा; पुर्नजन्म; प्लँचेट | १० | ६. | आरोग्य आणि अंधश्रद्धा | १५ |
| ९. | आरोग्य आणि अंधश्रद्धा-१ | १० | ७. | आत्मा; पुर्नजन्म; प्लँचेट | २५ |
| १०. | आरोग्य आणि अंधश्रद्धा-२ | १० | ८. | समाजसुधारक आणि अंधश्रद्धा | ५० |
| ११. | ज्योतिषाकडे जाण्यापूर्वी-१ | १० | ९. | भ्रामक वास्तुशास्त्र | १०० |
| १२. | ज्योतिषाकडे जाण्यापूर्वी-२ | १० | १०. | बुवाबाजी | १५ |
| १३. | अं.दू.च.कि.-१ | १० | ११. | मनोमनी डोकावतांना | ३० |
| १४. | अं.दू.च.कि.-२ | १० | १२. | धर्मांची तीर्थे कि तीर्थांचा बाजार | ५० |
| १५. | अं.दू.च.कि.-३ | १० | १३. | समृद्ध व्यक्तीमहत्व विकासासाठी | १० |
| १६. | विवेक जागर | १० | १४. | बुडता हे जन | ३५ |
| १७. | अंधश्रद्धा निर्मलन | २० | | (तुकारामांचे अंधश्रद्धेवरील अभंग) | |
| १८. | बुवाबाजी | १० | १५. | Vastu Feng-Shui-Science | |
| | | | | or Pseudo Science | ६० |

**पुस्तके मिळण्याचे ठिकाण**


**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

प्रा. मुंडेज क्लासेस

५०२, ओम् विश्वेश्वर दर्शन, ठाकूरवाडी, डोंबिवली (प.), ४२१ २०२

दूरध्वनी : (९५२५१) २४८ ६०९७


# अर्पण

**भूत, भानामती, पितर, प्लँचेट इ. अंधविश्वासाने ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तिंचे बळी घेतले त्या सर्वांना -**

प्रकाशक

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

# आत्मा पुनर्जन्म - प्लँचेट

सर्व हक्क समितीचे स्वाधीन

प्रा. प. रा. आर्डे,

☆ आत्मा पुनर्जन्म - प्लँचेट

☆ प्रकाशक आणि वितरक
**प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे**
(कार्यवाह प्रकाशन विभाग महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती)
५०२, ओम विश्वेश्वर दर्शन,
ठाकूरवाडी, डोंबिवली (प.) ४२१ २०२
दूरध्वनी (९५२५१) २४८६०९७

© महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती
द्वारा 'परिवर्तन'
सहयोग हॉस्पिटल ॲनेक्स
सदर बझार सातारा - ४१५००१

☆ मुखपृष्ठ सजावट :
सुनित म्हात्रे - डोंबिवली

☆ लेखक
**प्रा. प. रा. आर्डे**
५५, 'मानवता', यशवंत नगर, सांगली ४१६४१६

☆ अक्षर जुळणी
**उमेश सावंत**, भांडूप, मुंबई.

☆ मुद्रित शोधन
**सतिश पाटील**, मुलूंड, मुंबई.

☆ मुद्रण स्थळ
**पूजा प्रिंटीग प्रेस,**
जुनी डोंबिवली रोड, डोंबिवली (प.)

(आवृत्ती ५ वी - २००४)

किंमत - २५ /- रुपये

## अनुक्रमणिका


१) विवेक निष्ठा की रुढी दास्य ?

२) आत्मा : सत्य की कल्पित ?

३) देहात्मवाद

४) पुनर्जन्म - चिकित्सा

५) झाशीच्या राणीचा पुनर्जन्म

६) हिप्नॉटिक रिग्रेशन आणि पुनर्जन्म

७) प्लँचेटचे गौडबंगाल

८) परिशिष्ट - अ

९) परिशिष्ट - ब


# मनोगत

विविध अंधश्रध्दांच्या मुळाशी 'आत्मा' ही संकल्पना आहे. आत्मा असेल तर भूत आहे, सुष्ट व दुष्ट देवता आहेत. चेटूक, चकवा व अंगात देवी येणे हे खरे आहे असे मानावे लागते. सर्व प्रकारच्या तथाकथित अदृश्य दुष्ट व सुष्ट शक्ती हे वस्तुनिष्ठ सत्य नाही हा विज्ञानाचा निष्कर्ष आहे.

आत्मा नसेल तर गीता खोटी समजायची कां ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. याला शंकराचार्यांनीच समर्पक उत्तर दिले आहे. अग्नी थंड आहे असे कितीही महान व्यक्तिने सांगितले तर मी त्याच्यावर कां विश्वास ठेवावा ? कारण अग्नीला हात लावताच चटका बसतो हा माझा अनुभव आहे. महान ग्रंथ अपुरे असतात व महान व्यक्ति चुकू शकते हा जगाचा इतिहास आहे. दलित हे ब्रम्हदेवाच्या पायातून जन्माला आले ह्या वेद वाक्याने आपल्या देशात दलितांवर अत्याचार झाला ?

महत्वाचे आहे सत्य. सत्याचा बोध मानवी संस्कृतिच्या विकासाला हितावह असतो. समाजाची नीतीमूल्ये सत्याच्या कसोटीवर पारखायला हवीत. 'आत्मा' ही बाब श्रध्देची असली व काहींना ती नीतीसाठी पोषक वाटली तरी हाच आत्मा अंधश्रध्देच्या गर्तेत ओढणारा आहे. म्हणून नीतीचा पाया अज्ञान मूलक नसावा. विज्ञानाला विवेकाची साथ देऊन नैतिक जीवन जगता येते.

कल्पित देवदेवतांचा आधार घेऊन, महाराष्ट्रात व भारतात आधुनिक बुवाबाजी फोफावते आहे. जगन्नाथपुरीचा देव कुणी बापू मुंबईत आणतात हे कसे ? आणि लोक या भाकड प्रकारावर विश्वास ठेवतात कसे ? क्षणात आत्मा हजारो कि.मी. अंतर पार करतो, तो कुणाच्या तरी ताब्यात राहून अचाट कृत्ये करतो, भिंतीतून आरपार जातो, ह्या प्रकारांची सखोल चिकित्सा व्हावी. सामान्य लोकांनी 'आत्मा' या संकल्पनेबाबत नीट आकलन करून घेतले तर अंधश्रध्दामुक्त जीवनपध्दतीचा ते स्वीकार करतील.

आत्मा, पुनर्जन्म व प्लँचेट हे पुस्तक मार्च ९२ मध्ये प्रथम प्रकाशित झाले. सोप्या भाषेत लिहिलेले हे पुस्तक अल्पावधीतच लोकप्रिय झाले व त्याच्या १९९५ पर्यंत एकूण चार आवृत्त्या निघाल्या. त्यानंतर त्याला छोटा आकार देण्यात आला. गतवर्षी महाराष्ट्र अं.नि.स.च्या कार्यकारिणीत, हे पुस्तक पुन्हा मूळ स्वरुपात प्रसिध्द करण्याचे ठरले. त्यानुसार आता नवीन आवृत्ति प्रसिध्द होत आहे.

आधुनिक संशोधनातून, विशेषतः जैवतंत्रज्ञानातील संशोधनाच्या प्रकाशात 'आत्मा' ही संकल्पना असत्य असल्याचे सिध्द होत आहे. जिज्ञासूंनी परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' अवश्य वाचावे. ही माहिती थोडी क्लिष्ट वाटली तरी समजून घ्यावी.

प्रा. मुंडे व डॉ. दाभोलकर यांच्या सततच्या आग्रहामुळे हा पुस्तक प्रकल्प पूर्णत्वास जात आहे. त्यांचा मी ऋणी आहे.


**प्रा. प. रा. आर्डे**
५५ 'मानवता',
संग्राम व्यायाम शाळेसमोर,
यशवंत नगर,
सांगली - ४१६४१६


# १ - विवेक निष्ठा की रुढी दास्य ?

## आगरकरांचा प्रश्न :

गोपाळ गणेश आगरकरांनी लोकांना इशारा दिला होता. लोक हो ! तुम्ही विचार करायला कां घाबरता ? एखादी गोष्ट चांगली का तर आजपर्यन्त चालत आली आहे म्हणून, परंपरागत आहे म्हणून, मग तिचे परिणाम सुष्ट असोत किंवा दुष्ट असोत असे मानणे घातक आहे. एखाद्या गोष्टीचे परिणाम दुष्ट असतील तर ती परंपरागत असली तरी टाकून दिली पाहिजे. एखाद्या गोष्टीचे परिणाम कल्याणकारक आहेत तर मग ती नवीन असली, परंपरेच्या बाहेरची असली तरीसुध्दा तिचा स्वीकार केला पाहिजे.

आज अशी परिस्थिती आहे की विचार करायला घाबरणे बाजूलाच राहिले पण, माणसांना विचार करता येतो का याची तपासणी करावीशी वाटते. मेलेल्या माणसाचे प्रेत जाळून त्याची राख दहा दिशांना फेकून टाकली तरी देखील त्याचा आत्मा येथेच कोठेतरी किंवा अन्य ठिकाणी निदान काही वेळ जीव धरून असतो ही वन्य अवस्थेतील माणसाची कल्पना होती. आजही ही कल्पना सत्य मानणारी मंडळी बहुसंख्येने आढळतात.

## पूर्वज खोटे काय ?

रानटी लोकांना प्रतिध्वनी पिशाच्च आहे असे वाटत असे. आज आपणांस प्रतिध्वनी आवाजाच्या परावर्तनाने होतो हे माहीत झाले आहे. म्हणून आपण रानटी लोकांच्या पिशाच्च कल्पनेला हसतो. पण शरिरविज्ञान व मानसशास्त्र यांच्यात झालेल्या संशोधनाच्या आधारे, तथाकथित आत्म्याला शरिराविना वेगळे अस्तित्व नाही असे आपण पुराव्यानिशी जरी सांगू लागलो तरी लोक डोळे वटारतात आणि विचारतात की गीता खोटी आहे काय ? आपले पूर्वज खोटे काय ?

## मळलेली वाट सुखावह :

शारिरीक श्रमापेक्षा मानसिक श्रम करण्याचा मनुष्याला कंटाळा वाटतो. मळलेली वाटच त्याला प्रिय वाटते. ही वाट सोडून देणे त्याला बरे वाटत नाही. माणूस केवळ सत्याचाच भोक्ता नाही. अमुक गोष्ट खोटी आहे असे सिध्द करून दाखविले तरी ती तो सोडून देईलच असे नाही. शेकडा नव्याण्णव माणसे ज्याप्रमाणे आचारात त्याप्रमाणे विचारातही हाताला हात लावणारी असतात आणि नेमका याच गोष्टीचा फायदा आपले स्वार्थ जपू पाहणारी हितसंबंधी मंडळी घेतात.

## नवविचारांचा विजय अटळ :

जुन्या घातक कल्पना चालू राहू देण्यात समाजातील काही मंडळींचा फायदा असतो. ही मंडळी नवविचारांवर प्रतिहल्ले चढवितात. पण मानवी इतिहास तपासला तर अखेर नवविचारांचाच विजय होतो हे लक्षात येते. ख्रिस्ती धर्मपीठाने गॅलिलिओच्या खगोल संशोधनाला विरोध करून त्याचा छळ केला तरी गॅलिलिओला विज्ञानाचा जनक म्हणून गौरवाने संबोधले जाते. तुकारामाच्या अभंगांची गाथा इंद्रायणी नदीत बुडविली तरी त्याचे अभंग आजही गावोगावी गायिले जातात. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हते' हा मनुस्मृतीतला विचार आज कोणीही स्वीकारील असे वाटत नाही. स्त्रियांना शिक्षण देऊन पुरूषांबरोबर कला, विज्ञान इ. विविध क्षेत्रात वाव दिला पाहिजे हा महर्षी कर्वे व म.फुले यांचा विचार आज मान्यता पावला आहे. तात्पर्य नवविचार समाजाच्या प्रगतिसाठी आवश्यक असेल तर कालांतराने का होईना पण मान्यता पावतोच.

## रुढीची चिकित्सा व्हावीच:

आत्मा, प्लँचेट, भूत, पुनर्जन्म व विविध धर्मग्रंथातील विविध कल्पनांच्या चिकित्सेचा आग्रह कशासाठी ? आगरकराच्या शब्दात सांगायचे झाले तर धर्मकल्पनेच्या योगाने माणूस जसा सद्गुणी होतो तसा दुर्गुणीही होतो. मनुष्या-मनुष्यात सख्य उत्पन्न करण्यास जशी ही धर्मकल्पना कारण होते तशीच त्यांचे वैमनस्यासही ती कारण ठरते. हिच्या योगाने आजपर्यन्त जगाचे हित झाले आहे तितकेच अहितही झाले आहे. कुटुंबात आणि समाजात एकी राखण्याचे हिच्या अंगी जितके सामर्थ्य आहे तितकेच त्यात दुही माजविण्याचेही आहे. मनुष्यांना सत्कर्मे करण्यास हिने जितके प्रवृत्त केले आहे तितकेच साहसाची दुष्ट कृत्ये



करण्यासही प्रवृत्त केले आहे. सारांश हिचे स्वरूप जेवढे मनोहारी तेवढेच बीभत्सही आहे. हिचा प्रभाव जेवढा कल्याणप्रद तेवढाच अहितकारक आहे; आणि हिने जेवढे पुण्याला तेवढेच पापालाही उत्तेजन दिले आहे. म्हणून धर्मकल्पनांची चिकीत्सा व्हावीच. धार्मिक उन्मादाने काय घडते याचे अलिकडेच ताजे उदाहरण म्हणजे गुजरातमधील भीषण हत्याकांड.

## ग्रंथप्रामाण्य की विवेक ?

आत्मा, पुनर्जन्म व कर्मविपाकाचा सिध्दांत यांनी भारतीय समाजात विषमता पोसली. पूर्वजन्मातील पापांमुळे मी महार झालो असे चोखामेळा मानतो.

**एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागताची ।**
**एकासी वैभव राजाची पदवी । एक गांवोगावीं भीक मागे ।**
**हाचि न्याय तुमचे दिसतो कीं घरी । चोखा म्हणे हरि कर्म माझे ।।**

एखाद्या अगतिक बाईचा उपभोग घेण्यासाठी ढोंगी महाराज याच तत्वांचा आधार घेतात. असले बहुतेक बाबा स्वतःला कृष्णाचा अवतार मानतात. तू गेल्या जन्मी राधा होतीस व मी कृष्ण होतो हे ढोंगी बाबांचे बाईला काबूत घेण्यासाठी वापरायचे शस्त्र. पुनर्जन्माची कल्पना अशी अक्कलहुषारीने यौन शोषणासाठी वापरली जाते. भूत म्हणजे असमाधानी आत्मा. भूताने झपाटलेल्या स्त्रिया या खरे तर मानसिक विकाराच्या बळी असतात.देवर्षी भूत काढण्यापायी त्यांच्यावर अघोरी उपचार करतात. त्यात काहींचा मृत्यूही घडतो. रुढ कल्पनांची ही भयानकता लक्षात घेता त्यांच्या चिकित्सेची गरज लक्षात येते; परंपरा आहे, ग्रंथात लिहिले आहे म्हणून, थोरांचे बोल आहेत म्हणून ते सत्यच असणार, त्यावर विचारच नको हा अधिकारवाद रूढींच्या अनावश्यक व मारक प्रभावाला कसा रोखणार ? कोणत्याही गोष्टीची सत्या-सत्यता, इष्टानिष्टता ही विचारशक्तीच्या ( विवेकाच्या ) कसाला लावून पहाणे मानवाच्या सुखासाठी व प्रगतीसाठी आवश्यक आहे. याच कारणासाठी आत्मा, पुनर्जन्म व प्लँचेट यांची मूलग्राही वैज्ञानिक चिकित्सा निर्भयपणे केली पाहिजे.

# २- आत्मा : सत्य की कल्पित ?

## सत्य म्हणजे काय ?

शब्द मनाचा गोंधळ करू शकतात. आपल्या मनात असलेला एखाद्या शब्दाचा अर्थ हा दुसऱ्याच्या मनातील अर्थापेक्षा वेगळा असण्याची शक्यता असते. म्हणून सत्याची संकल्पना स्पष्ट केली पाहिजे.

सत्य दोन प्रकारच्या स्वरूपात मांडले जाते. वस्तुनिष्ठ सत्य आणि आत्मनिष्ठ सत्य. आत्मनिष्ठ सत्याला कलात्मक सत्य (Poetic Truth) असेही म्हणता येईल. दोन अधिक दोन बरोबर चार हे वस्तुनिष्ठ सत्य होय. वस्तुनिष्ठ सत्य कोणत्याहि प्रश्नाचे एकच उत्तर देते. विज्ञानात अशा वस्तुनिष्ठ पध्दतीने सत्य संशोधन होते.

व्यक्तिगणिक एकाच घटनेबाबत जर वेगवेगळी उत्तरे वा निष्कर्ष मांडले गेले तर त्यास आत्मनिष्ठ सत्य (Subjective Truth) म्हणता येईल. अस्तित्वात असलेल्या एखाद्या पदार्थाचे स्वरूप रेखाटताना कलावंत वा कवी प्रतिभेच्या जोरावर त्या पदार्थात नवे रंग भरून वेगळेच चित्र निर्माण करतो इतकेच नव्हे, तर अजिबात अस्तित्वातच नसलेल्या एखाद्या पदार्थाची आपल्या कल्पनेतून निर्मिती करण्याचे कार्यही तो करतो. स्वर्ग-नरक, देव-दानव, अप्सरा, पऱ्या हे सर्व कल्पित आहे. यामुळेच विविध धर्मात या कल्पितांची स्वरूपे वेगवेगळी आढळतात. वास्तव सृष्टी व कल्पित सृष्टी यांच्यामधील भेदाचे हे स्वरूप नीट समजून घेतले पाहिजे.

## हा भेद कशासाठी ?

सत्य ( वस्तुनिष्ठ) व कल्पित ( आत्मनिष्ठ) असा भेद का मानावयाचा ? हा भेद मानणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यांना सृष्टी नीट जाणून घ्यावयाची आहे आणि तिला अनुकूल करून घेऊन मानवाचे अधिकाधिक कल्याण करावयाचे आहे, त्यांच्या



दृष्टीने तर असा भेद मानणे अत्यंत आवश्यक आहे. वस्तुनिष्ठ सत्याचे कार्य वास्तव सृष्टीची अनुरूप रचना करून घेणे हे आहे. हे कार्य आत्मनिष्ठ सत्याचे नव्हे. कल्पिताने वास्तव बदलता येत नाही. पण खरी अडचण वेगळ्याच कारणाने निर्माण होते.

देव , आत्मा वगैरेंना सत्य मानणारे लोक त्यांच्याकडे कलात्मक सत्य या भावेनेने पहात नसतात. एकाच्या जागी दुसऱ्याचा वापर केल्यामुळे मानवापुढे भीषण स्वरूपाची संकटे उभी रहाण्याचा धोका संभवतो. सृष्टीच्या रचनेत काही बदल घडवून आणावयाचा असेल तर त्यासाठी सृष्टीच्या नियमांचे वस्तुनिष्ठ ज्ञानच आवश्यक असते. कलात्मक व कल्पित सत्याचे नियम वापरून नदीतील पाणी शेताला देता येत नाही. देवाची प्रार्थना करून दुष्काळ हटविता येत नाही. तसेच नवस करून मुले होत नाहीत. कल्पित सत्य मानणाऱ्यांना हे मान्य नसते. त्यांच्या अज्ञानामुळे व हेकटपणामुळे मानवाला फार मोठे दुष्परिणाम भोगावे लागले आहेत.

## काचेच्या पेटीचा प्रयोग :

ज्याचे मरण जवळ आले आहे अशा माणसास बंद काचेच्या पेटीत ठेवले. काही सेकंदात तो मरण पावला. त्याबरोबर पेटीत स्फोट झाला व पेटीची काच तडकली. पेटीतील माणसाचा आत्मा बाहेर पडला. त्यामुळे काच तडकली. याचा अर्थ आत्मा हा कल्पित नाही तर बंदुकीच्या गोळीसारखा पदार्थ आहे (वास्तव सत्य) असे मानावे लागेल.

## धान्यराशी पळविणारे चेटूक :

सामान्य माणसांना विश्वासात घेऊन चर्चा करायला सुरवात करा. अनेक असत्य कल्पनांनी भरलेल्या कथा ऐकायला मिळतील. 'क्ष' च्या घरात चेटूक होते. (चेटूक म्हणजे एक प्रकारचा आत्मा) तो 'य' च्या खळ्यावरील राशीतील धान्य पळवून 'क्ष' च्या घरी आणी. त्यामुळे 'य' खूप कष्ट करूनही गरीबच राहिला. 'क्ष' मात्र धनवान झाला इ.

आत्मा ही कल्पना अशा प्रकारे जनमानसात वास्तव सत्य म्हणून खोलवर रुजलेली आढळते. यासाठीच आत्मा कल्पित की वास्तव याची चिकित्सा महत्वाची ठरते.

वर सांगितलेली काचेच्या पेटीची कथा पूर्णपणे बनावट आहे. काचेच्या पेटीचा प्रयोग कोणी केला, केव्हा केला, कोठे केला असे कथा सांगणाऱ्याला विचारले

तर आम्ही हे अमक्या-तमक्या मासिकातून अगर पुस्तकातून वाचले असे उत्तर येते.

कधी-कधी छापील मजकूर असलेली पत्रके काही लोक रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना वाटत असतात. पत्रकातील मजकूर खालील स्वरुपाचा असतो.

'संतोषी माता माझ्या स्वप्नात आली. तिने सांगितले आणखी दहा जणांना माझ्या सामर्थ्याबद्दल पत्रे लिही. ही पत्रे ज्यांना मिळतील त्यांनी आणखी दहा जणांना अशीच पत्रे पाठवावी. जे असे करणार नाहीत त्यांच्यावर मातेचा कोप होईल. एकाने असले पत्रक फाडले तर दुसऱ्याच दिवशी त्याची २ मुले व बायको अपघातात ठार झाली' इ.

हा छापील मजकूर खरा मानायचा कां ? छापलेली प्रत्येक गोष्ट सत्य असतेच असे नाही. म्हणून त्याची चिकित्सा करून पडताळा पहाणे सत्य संशोधनासाठी आवश्यक ठरते. चिकित्सेअंती पुरावा उपलब्ध झाला नाही, उलट अनुभव आला तर ती गोष्ट नाकारणेच योग्य ठरते.

काचेच्या पेटीचा प्रयोग जगाच्या पाठीवर कुठे झाला असता तर लगेच जगभर त्याची प्रसिध्दी झाली असती. जीव-विज्ञानाच्या व मनोविज्ञानाच्या नियतकालिकातून अशा प्रयोगांना प्रसिध्दी मिळाली असती. ज्ञानकोशात या प्रयोगाचा समावेश झाला असता. पण काचेच्या पेटीचा प्रयोग अशा कोणत्याच विश्वसनीय वाङ्मय साधनात आढळत नाही.

महाराष्ट्रातील एक धर्मप्रचारक आपल्या प्रवचनातून एक कथा सांगत असे.

'जपानमधील एका वनस्पती शास्त्रज्ञाने गुलाबावर प्रयोग केले. प्रेम प्रक्षेपणाने गुलाबाच्या रोपाला कळ्या लागल्या असे त्या शास्त्रज्ञाने सिध्द केले. म्हणजे गुलाबाच्या रोपाकडे प्रेमभावनेने एकटक बघत बसा की रोपावर गुलाब फुललेच ! दि. के. बेडेकर यांनी वनस्पती शास्त्रावरील ज्ञानकोश उलथे-पालथे घातले, त्यांत वरील प्रयोगाची कोठेही माहिती नव्हती. म्हणजे हा प्रयोग चक्क लोणकढी थाप होती. शोध घेण्याच्या प्रयत्न केल्यास ज्या घटनांचा फोलपणा सिध्द होतो त्या घटना ग्रंथात छापलेल्या आहेत अगर कुणी थोराने सांगितल्या आहेत म्हणून खऱ्या मानाव्यात काय ? रेड्याने दूध दिले असे महान ग्रंथात छापलेले आढळले तर रेडा दूध देतो असे आपण समजायचे काय ?'

चेटूक (याला काही भागात पितर असे नाव आहे ) खळ्यावरचे धान्य पळविते. म्हणजे त्याला हातपाय असले पाहिजेत. पण हे चेटूक आपणांस शोध



घेऊ गेल्यास कोठेच सापडत नाही. धान्य कमी होण्यास इतर कारणे आढळून येतात. शेजारचा शेतकरी कष्टाळू असतो. तो थोड्या जमिनीत भरपूर पीक काढतो. ज्या शेतकऱ्याला असे वाटते की आपले धान्य कमी का ? त्याने आळसात दिवस घालविलेले असतात. त्याचा नोकर एखादे वेळी चोरून धान्य पसार करतो इ. म्हणून चेटूक हे वास्तव सत्य नाही.

आत्मा हा शरिररूपी पिंजऱ्यातील पक्षी. माणून मेला की शरिरापासून आत्मा मुक्त होतो. त्याला मरण नसते. याचा अर्थ आत्मा वस्तुनिष्ठ आहे असा होतो. आत्म्याचे अशा स्वरूपाचे अस्तित्व सिध्द करण्याच्या नाना लटपटी - खटपटी काहीजण करतात. चिकित्सेच्या आधाराने यातील फोलपणा आपणांस समजून देणे अवघड नाही.

## एक युक्तीवाद असा –

सर्व धर्मात आत्मा मानला आहे. मृत्युनंतर आत्मा मागे रहातो, त्याला मरण नाही असे मानले आहे. हे खोटे कसे असेल ?

## उत्तरें अनेक प्रश्न एक –

आत्मा हे वस्तुनिष्ठ सत्य असेल तर आत्म्याच्या स्वरूपाविषयी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर एकच हवे. पृथ्वीतलावर कोणत्याहि ठिकाणी दोन अधिक दोन बरोबर चार हे एकच उत्तर येते. पण विविध धर्मात आत्म्याच्या स्वरूपाबद्दल येणारी उत्तरे विविध आहेत.

हिंदु धर्मात मृत्युनंतर आत्मा भूत- पिशाच्च बनून भटकत रहातो किंवा दुसऱ्या शरिरात प्रवेश करून पुनर्जन्म घेतो किंवा थेट स्वर्गात जातो असे मानले जाते. मुस्लिम धर्मात पुनर्जन्म नाही. कयामतचा दिवस येईपर्यन्त आत्मे दफनभूमीत पडून रहातात व कयामतच्यावेळी न्यायनिवाडा होतो. ख्रिश्चन धर्मात न्यायनिवाड्याच्या दिवसाची (The Day of judgement) कल्पना आहे. तो दिवस व कयामतचा दिवस यांच्यात एकवाक्यता नाही.

जर्मन महाकवी गटे याच्या डिव्हाइन कॉमेडी या ग्रंथात मृत्यूनंतरच्या जीवनाचे चित्र कसे रेखाटले आहे ते पहा.

पृथ्वीभोवती सात आभाळे आहेत. पुण्यवान माणसाच्या आत्म्याची त्यांच्या खात्यावर जेवढे पुण्य जमा असेल त्या प्रमाणात या सात स्वर्गांपैकी योग्य त्या स्वर्गात रवानगी होते. जे पापी असतात त्यांची हकालपट्टी जेरूसलेमच्या विरूध्द टोकाला

असलेल्या नरकात होते.

## हिंदु लोक एकच स्वर्ग मानतात.

अशा प्रकारे आत्म्याबद्दल विविध लोकांच्या विविध कल्पना आहेत. म्हणून आत्मा हे वस्तुनिष्ठ सत्य (Physical Fact) नाही . तो कल्पनाविलास आहे.

विविध धर्म ज्या काळात निर्माण झाले त्या काळातील मानवी बुध्दिची समज अपुरी असावी. त्याकाळी मनाचे, शरिराचे व निसर्गाबद्दलचे मानवाचे ज्ञान अपुरे होते. प्रत्येक घटनेचा अर्थ लावण्याची गरजही असते. या धडपडीतून कल्पनाविलास सहज शक्य होतात. अचानक नदीला पूर आला, भूकंप झाला, मोठे वादळ झाले तर महादेवता कोपल्यामुळे असे घडले असे मानणे शक्य होते. कारण त्याकाळच्या मानवाच्या ज्ञानाला मर्यादा होती. माणूस मेल्याचे दुःख व त्याच्या मरणोत्तर अस्तित्वाबद्दलचा कल्पनाविलास हा गरजेपोटी शक्य होता. पण हे ज्याच्या-त्याच्या कल्पनेतून स्फुरलेले काव्य अगर आत्मनिष्ठ सत्य आहे हे आपण समजून घ्यायला हवे.

## पिंडाला कावळा कां शिवत नाही ?

आत्मा नसेल तर पिंडाला कावळा कधी पटकन शिवतो तर कधी लवकर शिवत नाही हे कसे घडते ?

कोल्हापूरचे जेष्ठ सत्यशोधक भाई नार्वेकर यांचे मृत्यूपत्रातील ‘ नार्वेकर गुरुजींचा अखेरचा निरोप’ या मथळ्यामधील आत्मनिवेदन डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या भ्रम-निरास पुस्तकात दिले आहे. या मृत्यूपत्राचा भाग वरील प्रश्नासंदर्भात समजून घेण्यासारखा आहे.

‘‘मृत्यूनंतरचा विधी म्हणजे राख सावडणे आणि नंतर दशपिंड. दशपिंडाच्या वेळी प्रेताच्या मुलांनी अगर जवळच्या नातलगांनी स्मशानभूमीत जाऊन नदीवर आंघोळ करावयाची. न्हाव्याकडून संपूर्ण केस काढून घ्यावयाचे. मग पुरोहित-भटजी सांगेल त्याप्रमाणे विधी करावयाचा. मेलेल्या माणसाच्या आत्म्याला समाधान मिळावे म्हणून, चांगले जेवण करून पत्रावळीवर वाढावयाचे आणि कावळ्यांना काव काव करून हाका मारावयाच्या आणि वाढलेल्या पानापासून दूर जाऊन बसायचे. जर कावळ्याने चटकन् पानाला शिवले तर मेलेला माणूस भाग्यवान असे म्हणायचे. कावळ्याने लवकर पानाला शिवले नाही, तर मग त्याची इच्छा कोठेतरी



अडकली असावी म्हणायचे आणि त्याच्या आवडीचा पदार्थ उदा. तंबाकू (दारू सुद्धा) आणून त्या पानावर ठेवायची आणि थोडे लांब जाऊन बसायचे. तेवढ्यानेहि कावळ्याने पानाला शिवले नाही तर मग त्याची मुलगी अगर मुलगा असेल त्याचे आम्ही पालन-पोषण चांगले करू, लग्न करू, तू काळजी करू नकोस असे गाऱ्हाणे घालून थोडे अधिक लांब जाऊन बसावयाचे. माणसे थोडी अधिक लांब गेली म्हणजे कावळा चटकन येतो आणि अन्नाला चोच मारून जातो. मग लगेच सर्वांनी म्हणायचे, ‘त्याचा जीव मुला-मुलीत घुटमळत होता’.

कावळा पानाजवळ कां येत नाही ? त्याला वाटते की, ‘एरवी आपल्याला हाकलून देणारी ही माणसे आम्हाला मुद्दाम बोलावून जेवणाचे सर्व पानच कां देत आहेत ? यात काहीतरी धोका असावा.

प्रत्येक प्राणी आपल्या जिवाला भयंकर भीत असतो, त्याचा अर्थ माणसे आपल्याला हवा तसा काढतात. पानापासून माणसे खूप लांब गेली असली तरी कावळा ते अन्न निवांतपणे खात बसत नाही. एक चोच मारतो आणि उडून जातो. कावळ्याने पानाला शिवले की जमलेली माणसे निघून जातात आणि मग कावळे यथेच्छ पानावर ताव मारतात.

सर्व पक्षांमध्यें घाण पक्षी कावळा आणि त्याच्यातून आमच्या नातलग व्यक्तिंचा आत्मा येतो असे मानणे म्हणजे केवढा निर्बुद्धपणा !’’

इतर पक्षांपेक्षां कावळा धीट असतो पण तो सुद्धा गर्दीला घाबरतो या निरीक्षणातून कावळ्याच्या रुपात आत्मा येतो असे मानणे चूक होईल हे सूज्ञांच्या लक्षात यावे.

मी स्वतः पिंडाला कावळा शिवण्याच्या घटनेचे अनेक वेळा निरीक्षण केले आहे. ऐन तारुण्यात माझा भाऊ निधन पावला. त्याला पत्नी व ३ मुले आहेत. त्याच्या पिंडाला कावळा पटकन् कसा शिवला ? त्याचा आत्मा अतृप्तच असणार. माझे एक जेष्ठ स्नेही. त्यांची वयात आलेली मुलगी, लग्नाचे प्रयत्न सुरु होते. मुलगी फारच लाडकी. धुमधडाक्यात लग्न व्हावे ही त्यांची इच्छा. ते अचानक वारले. त्यांच्या दशक्रिया विधीला मी हजर होतो. त्यांच्या पिंडाला कावळा पटकन शिवला. त्यांच्या आत्मा अतृप्त असणार. मग कावळा पिंडाला कसा शिवला ?

माझ्याच महाविद्यालयातील एक प्राध्यापिका. त्यांना मुलगा एकच. वय १८ वर्षे. स्कूटर अपघातात तो वारला. या मुलाची कोणती स्वप्ने पुरी झाली होती ? पण त्याच्या पिंडाला कावळा पटकन् शिवला हे मी स्वतः पाहिले. हे कसे ?

हिंदूनाच फक्त आत्मे असतात आणि चिन्यांना, जपान्यांना व रशियन लोकांना

आत्मे नसतात ? ख्रिश्चन व मुस्लिमांना आत्मे नसतात ? त्यांच्या समाजात पिंडाला कावळा शिवण्याचा प्रकार नाही, याचे उत्तर काय ?

कधी कधी एकाच वेळी अनेक कावळे पिंडाला शिवतात. मग मृत माणसाचा आत्मा या सगळ्या कावळ्यात विभागून घुसला असे समजायचे काय ?

कैलास लोंढे या नगर जिल्ह्यातील कान्हूर पठार गावच्या तरुणाने या संदर्भात एक धाडसी अनुभव घेतला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा लोंढे हा क्रियाशील कार्यकर्ता. लोंढे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी ३१ डिसेंबर १९९० रोजी रात्री १२ वाजता कापडी मनुष्याकृतीचे सर्व धार्मिक विधी करून दहन केले. १० जानेवारी १९९१ रोजी दशक्रिया विधी पार पाडला. हा विधी खरा माणूस मेल्यानंतर करतात अगदी तसाच करण्यात आला. विशेष म्हणजे पिंड तयार करत असतानाच कावळ्यांची गर्दी होवू लागली व पिंडदान करणारे दोन पावले मागे सरकताच कावळा पिंडाला शिवला.

कापडी मनुष्याच्या पिंडाला सुद्धा कावळा शिवला ! यातून जे निष्कर्ष निघतात ते असे, (१) कापडी मनुष्याला आत्मा असतो. (२) आत्मा असण्याचा व पिंडाला कावळा शिवण्याचा काहीही संबंध नाही.

कापडी मनुष्याला म्हणजे निर्जीव वस्तूला आत्मा असतो असे समजणे हास्यास्पद आहे. दुसरा निष्कर्ष सूज्ञाना मान्य व्हावा.

## आणखी एक फसवा युक्तीवाद –

मृत व्यक्तिला पुढील जन्म कोणता मिळाला हे जाणण्यासाठी हिंदू लोक सुपात धान्याचे पीठ पसरतात. त्या पीठावर ज्या प्राण्याच्या पाऊल खुणांची आकृति उमटेल त्याच्या जन्माला मृत व्यक्ति गेली असा समज आहे हे कसे घडते ? हे जर खरे असेल तर आत्मा व पुनर्जन्म सिद्ध होतो. याचे उत्तर काय ?

पीठ ज्या सुपात ठेवले जाते ते अगोदर शेणाने सारवलेले असते. सारवलेले सूप वाळले की, त्याला पोपडे सुटतात. त्यामुळे पिठावर उंचवटे वा खळगे तयार होतात. त्यामुळे पीठावर आकृती उमटल्याचा भ्रम होतो.

पीठावरून एखादे वेळी मुंगळा, मुंग्या अगर झुरळ फिरते. त्यामुळे पीठावर रेघोट्या उठतात. त्या रेघोट्यातून कशाची तरी पावले उमटल्याची आपली भावना होते.

आपणास प्रिय असलेली व्यक्ति आपणास सोडून जाणे ही कल्पनाच दुःखदायक असते. परंतु हे कटु सत्य असते. ते धैर्याने स्वीकारणे हा खरा शहाणपणा. मृत्यूपूर्वी तिच्यावर निरपेक्ष प्रेम करणे तिच्या सुखासाठी धडपडणे, तिचा सांभाळ करणे यातूनच आपली सद्भावना व्यक्त करावी. आपल्या वडिलांना पुरणपोळी



आवडत असेल तर मृत्यूपूर्वी त्यांची वासना शमविणे हेच शहापणाचे. मेल्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य वडील कसे खाणार ? पण अतीव प्रेमापोटी वियोग सहन न होणाऱ्या मंडळींना पुनर्जन्माच्या कल्पनांवर झुलवत ठेवून बारशापासून-बाराव्यापर्यंत विविध कर्मकांडे करावयाला लावायची व आपली तुंबडी भरायची ह्या चाणाक्ष मंडळींच्या कारवाया आपल्या ध्यानात येत नाहीत.

कोणी काहीही म्हणो, अज्ञान व भीती यांची आयुधे वापरून सामान्य माणसांचे जीवन नियंत्रित करणे नैतिक नाही. सुखाचा व नीतीचा मार्ग सत्यापासून सिध्द व्हावा. अज्ञान व असत्य यातून अंधश्रध्दा जन्म घेतात व शोषणाला संधी मिळते. म्हणून आत्मा हे वस्तुनिष्ठ सत्य नाही याचे भान ठेवावयास हवे.

## सोन्याच्या आंब्याचे दान –

शोषणास आत्म्याची कल्पना कशी वापरली जाते याबद्दल बिरबलाची एक गोष्ट प्रसिद्ध आहे.

एका गृहस्थाचे वडील वारले होते. स्वर्गात ते सुखात आहेत का हे जाणण्याची त्या गृहस्थाला अनावर इच्छा झाली. तो ब्राह्मणाकडे गेला व आपल्या वडीलांच्या क्षेम कुशलबाबत त्यास विचारु लागला. ब्राह्मण म्हणाला, 'तुझे वडील स्वर्गात मजेत आहेत, पण त्यांची एकच इच्छा अपुरी राहिली. त्यांना मरतेवेळी आंबा मिळाला नाही.' यावर उपाय काय असे त्या गृहस्थाने विचारताच 'सोन्याचा आंबा मला दान कर' असे ब्राह्मणाने सांगितले. ही गोष्ट बिरबलाच्या कानावर गेली. गरीब गृहस्थाला बनेल ब्राह्मण फसवित आहे हे चाणाक्ष बिरबलाच्या ध्यानात आले. त्याने ब्राह्मणाला बोलावून घेतले. बिरबल त्याला म्हणाला, 'तू म्हणतोस ते खरे आहे. गृहस्थाच्या बापाला मी स्वर्गातून आत्ताच भेटून आलो. त्याला आंबे हवेत पण त्याची गंभीर तक्रार आहे. त्याची पाठ फार दुखते आहे. तुला सोन्याचा आंबा दान केला तर स्वर्गातील पितराला पोहोचतो मग तुझ्या पाठीवर तापलेल्या सळीने चटके दिले तर गृहस्थाच्या स्वर्गातील बापाची पाठदुखी लगेच थांबेल.'

स्वर्गस्थ आत्मा आंबे खातो असे सांगणाऱ्या त्या ब्राह्मणाने खजील होऊन बिरबलाची क्षमा मागितली. त्र्यंबकेश्वरला नारायण नागबलीचा विधी पितराना तृप्त करण्यासाठी केला जातो. या विधीला ५ हजार रुपयापासून २५००० रुपयापर्यंत दक्षिणा घेतली जाते. आर्थिक शोषणाचा ह्या गंभीर प्रकाराला आत्म्याच्या कल्पनेचे पाठबळ आहे.

☆☆☆

# ३ - देहात्मवाद

## बुद्धीला पटते पण -

अनंत काणेकराचा एक लघुनिबंध आहे. ''बुध्दिला पटते, पण मनाला कसेसेच वाटते ....'' ''आपल्या बुध्दिमान संशोधक मित्राबरोबर जात असता वाटेत देऊळ लागले. ईश्वर न मानणाऱ्या या मित्राने झट्दिशी नमस्कार केला. मी हसून म्हणालो 'ईश्वर नाही असे तू सांगतोस मग नमस्कार कुणाला केलास ?

''अरे, नाही हे खरं; पण समजा, चुकून असलाच तर काय घ्या ? एवढ्याशा कारणावरून कोपायचा. नसलाच तर जास्तीत जास्त नमस्कार फुकट जाईल !''

मनाला कसेसेच वाटणाऱ्यांना आत्मा कल्पित की वस्तुनिष्ठ याचा विचार करण्याची आवश्यकता वाटणार नाही. पण मानवी संस्कृतिचा आणि सुधारणेचा इतिहास म्हणजे मनुष्याच्या बुध्दिचा उत्तरोत्तर विकास व अज्ञानातून मुक्तता असे ज्यांना वाटत असेल त्यांनी निर्भयपणे रुढ कल्पनांची चिकित्सा केलीच पाहिजे व नव्याचा स्वीकार केला पाहिजे.

## श्रद्धेला प्रश्न नाही !

आत्मा अमर असतो. तो अविनाशी आहे. जुनी वस्त्रे फेकून नवी वस्त्रे धारण करावी त्याप्रमाणे जीर्ण शरीर सोडून नव्या शरीरात आत्मा प्रवेशतो ही आमची श्रद्धा आहे. या श्रद्धेला प्रश्न विचारु नका असे ज्यांना वाटत असेल त्यांच्यासाठी हे लिखाण नाही. पण त्यांनी हे ही लक्षात घ्यावे की श्रद्धेला प्रश्न विचारुनच आपण विकसित झालो आहोत. दलित हे ब्रम्हदेवाच्या पायातून जन्माला आले असे हिंदू धर्मग्रंथ म्हणतात. आंबेडकरांनी प्रश्न विचारला. दलित जागे झाले आणि आज ताठ मानेने ते विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. बायबलमधील विश्वकल्पनेबाबत गॅलिलीओने प्रश्न उपस्थित केले आणि विज्ञानाचा पाया घातला. त्यातून युरोपात वैज्ञानिक क्रांती झाली. बुध्दिच्या प्रकाशात श्रद्धा तपासली म्हणूनच हे घडले.



विज्ञानपूर्व काळात विविध धर्मातील विचारवंताना वस्तुनिष्ठ सत्य जाणण्याची क्षमता नव्हती. पण प्रश्न तर सोडविलाच पाहिजे. आत्म्याबाबतच्या कल्पनाविलासाचा इतिहास मोठा मजेशीर आहे. आत्म्याच्या कल्पनेचा उगम धर्माचा उदय होण्यापूर्वीच्या रानटी अवस्थेतील पूर्वजांच्या अज्ञानात आहे.

## आत्म्याबाबतच्या विविध कल्पना -

मलाया द्वीप समूहातील मूळचे रहिवासी आत्मा मक्याच्या दाण्याएवढा व लाल रंगाचा आहे असे मानत होते. इतर मलेशियन जमाती आत्मा धुक्यासारखा मानत असत. त्यांच्या कल्पनेप्रमाणे आत्म्याचा आकार हाताच्या अंगठ्याएवढा आहे. पॅसिफिक समुद्रातील बेटामधून राहणारे आदिवासी आत्मा शरीरात विशिष्ट ठिकाणी नसतो तर सर्व शरीरात पातळ द्रव्याच्या स्वरुपात पसरलेला असतो असे मानीत (स्पंजातील पाण्याप्रमाणे). जपानमधील मागास जमाती आत्मा काळ्या रंगाची लहान वस्तू आहे असे मानीत. ऑस्ट्रेलियातील काही जमातीत आत्मा लहान असून तो छातीच्या पोकळीत बसतो असे मानीत होत्या. अंदमानातील लोक पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबास मनुष्याचा एक आत्मा मानतात. स्वप्नात आत्मा नाकपुड्यातून बाहेर पडून पाहिजे तिकडे वावरतो आणि हव्या त्या क्रिया करतो असाही या लोकांचा समज आहे. कोणत्याही कारणामुळे एखादे वेळी बेशुध्दि आली तर त्याचा आत्मा कोठेतरी भटकत असल्यामुळे हे घडते अशीही पुष्कळ लोकांची समजूत होती.

निद्रावस्थेत आत्मा शरीर सोडून भटकत असतो. त्याचप्रमाणे माणूस मेल्यावर त्याचे शरीर सोडून दुसऱ्या ठिकाणी भटकणारा आत्मा त्याच शरीरात परत कां येऊ नये ? रानटी अवस्थेतील लोकांना असे वाटत होते आणि मरणाबद्दल मोठी झोप समजून ते अशा प्रकारचे तर्क करीत होते असा इतिहास आहे.

## स्वप्नातील अनुभव -

माणसाला आत्म्याची कल्पना कशी सुचली असावी ? लहान मुले कधी कधी झोपेत एकाएकी जागी होतात आणि मोठ्याने रडू लागतात. रडण्याचे कारण विचारले तर ती त्याकडे लक्ष न देता अधिकच रडू लागतात. थोपटून, पोटाशी धरून मोठ्या प्रयासाने त्यांचे रडणे बंद केले म्हणजे ती शुद्धीवर आल्यासारखी होतात. अशारितीने सावध केलेल्या मुलास बोलता येत असेल व नजरेपुढे होऊन

गेलेली गोष्ट सांगता येत असेल तर तो असे म्हणेल की अमका-अमका मला मारु लागला म्हणून मी रडलो. थोर माणसे व लहान मुले झोपेत जे बरळत असतात त्यावरुन व झोपेतून दचकून उठताना त्यांच्या तोंडातून जे शब्द मोठ्याने एकाएकी निघतात त्यावरून त्यांना कसल्या प्रकारची स्वप्ने पडत असावीत हे सहज समजते. पुष्कळ वेळा ही स्वप्ने इतक्या व्यवस्थित रितीने व स्पष्टपणाने पडतात की चांगल्या सुजाण व प्रौढ मनुष्यास देखील जागे झाल्यावर आपण स्वप्नात होतो अशी खात्री होण्यास बराच वेळ लागतो. अंथरुण चाचपावे, डोळे चोळावे, हात-पाय हलवावे आणि कसला तरी थोडा बहुत उजेड असल्यास इकडे-तिकडे बराच वेळ न्याहाळून पहावे, तेव्हां कोठे आपण निजलेल्या ठिकाणीच आहोत, आपल्या सभोवतालच्या वस्तू जागच्या जागी आहेत आणि आपण कोठे गेलो नाही व आपणाकडे कोणी आले नाही अशी खात्री होते. तात्पर्य स्वप्नातील भास जरी मिथ्या आहेत असे दिसून आले तरी जोपर्यन्त आपण स्वप्नात गर्क असतो तोपर्यंत ते खरे वाटतात. अशा भासाबद्दल माणसाने जे अनेक तर्क केले असतील. त्यातूनच आत्म्याची कल्पना निर्माण झाली असावी. हे कसे घडले असावे ?

जागेपणी ज्ञानेंद्रियांचे व्यापार चालू असतात. डोळे बघत असतात, कान ऐकत असतात इत्यादि. पण स्वप्नामध्ये तसे नसते. स्वप्नात ज्ञानेंद्रिये निष्क्रिय असतात. हात-पाय हलत नसताना, डोळे बंद असताना, कान थंड असताना आम्हास सुख दुःखाचा भास होतो हे कसे ?

तर्काने असे अनुमान काढता येईल की ज्याचा शरीर व्यापाराशी संबंध नाही पण ज्याला सुखदुःखाचा अनुभव होतो असा कोणीतरी अशरीरी आपल्यात वास करीत असला पाहिजे. तोच हा आत्मा. तो झोपेत शरीरातून बाहेर पडतो, हवा तेथे संचार करतो, अलभ्य वस्तूंचा लाभ घेतो इ.

## लांडग्याची गोष्ट –

तर्कातूनही बऱ्याच वेळा फसगत होण्याचा संभव असतो. म्हणून ज्ञानासाठी तर्क खात्रीशीर प्रमाण मानता येत नाही. या संदर्भात एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.

नास्तिक विचार स्वीकारलेला कोणी एक मनुष्य होता. त्याची पत्नी मात्र आस्तिक विचाराची होती. तो तिचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न करी. तिला मात्र त्याचे म्हणणे पटत नसे. तेव्हा त्याने एका क्लृप्ती काढली. तो पहाटेपूर्वी तिला घेऊन गावाबाहेर गेला. अप्रत्यक्ष पदार्थाविषयी अनुमाने करणाऱ्या या नगरवासी लोकांचे



चातुर्य तू पहा, असे तो तिला म्हणाला. त्यानंतर त्याने वेशीपासून गावातील चौकापर्यन्तच्या धुळीने भरलेल्या राजमार्गावर आपल्या हाताची तीन-तीन बोटे विशिष्ट पद्धतीने उठविली. ते ठसे लांडग्याच्या पावलासारखे होते. सकाळी उठून लोक तिथे जमा झाले आणि म्हणू लागले, अहो, लांडग्याच्या पावलाचे दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीने स्पष्टीकरण संभवत नाही. रात्री वनातून एखादा लांडगा येथे आला असला पाहिजे. मग तो नास्तिक आपल्या पत्नीला म्हणाला, 'प्रिये, पहा ! लोक हे ठसे लांडग्याच्या पावलाचे आहेत असे म्हणत आहेत. हे खूप जण आहेत आणि ते समान विचार मांडत आहेत. लांडग्याच्या पावलाविषयीच्या वस्तुस्थितीचे योग्य ज्ञान नसलेले ते खूप जण एकसमान बोलत असले तरी सत्य माहित असणाऱ्या आपणासारख्यांनी त्यांचे म्हणणे स्वीकारावे काय ?' त्यानंतर तिने पतीचे सर्व बोलणे मान्य केले.

आत्मा हा देहभिन्न आहे, तो वस्तुस्वरुप आहे असे हजारो जण मानत असले तरी आत्म्याच्या स्वरुपाचा प्रश्न विवेकाने सोडवावा लागेल. यासाठी साधन काय? विज्ञानाच्या प्रगतिने शरीर व मन यांचे जे विश्वसनीय ज्ञान मानवाने मिळविले आहे त्याच्या आधारे आत्म्याच्या अस्तित्वाचा प्रश्न सोडविणे कठीण नाही.

## सूक्ष्म शरीराची संकल्पना –

विविध मागास जमातींनी धर्माचा उदय होण्यापूर्वीच्या काळात आत्मा ही वस्तु आहे अशी संकल्पना केली होती हे आपण मागे पाहिले. हीच संकल्पना उपनिषदात स्वीकारली गेली. उषनिषदकारांनी आत्म्याला सूक्ष्म शरीर मानले आहे. त्यांच्या मते आत्मा देहभिन्न व स्वतंत्र (Disembodied Spirit) नाही; तर तो शरिराचीच प्रतिकृती असून त्याचा आकार अंगठ्याएवढा आहे. जिवंत शरिराचे जे गुणधर्म तेच सूक्ष्मशरिररुपी आत्म्याचे गुणधर्म. जिवंत माणसाला स्मृति असते. ती सूक्ष्मशरिररुपी आत्म्यालाही असणार. उपनिषदकारांच्या मते माणसाच्या मृत्यूनंतर पार्थिव शरिर नष्ट झाले तरी सूक्ष्मशरिररुपी आत्मा नष्ट होत नाही. आपल्या मूळ स्वरुपात तो दुसऱ्या शरिरात प्रवेश करतो. सूक्ष्मशरिररुपी आत्म्याबरोबर त्याची स्मृतीही जाते. म्हणूनच मागच्या जन्मातील स्मृति माणूस आठवू शकतो. यास्तव पुनर्जन्म सत्य आहे. इ.

वरील उपपत्ति तपासता येईल. शरिर विज्ञानात एवढी प्रगति झाली आहे की शरिराच्या विविध भागांचे सूक्ष्म अवलोकन आपणाला करता येते. मरतेवेळी पार्थिव

शरिरातून बाहेर पडणारा सूक्ष्मशरिररुपी आत्मा बारकाईने व अचूक निरीक्षणे घेऊन पहाता येईल. निरीक्षणातून तो निसटणे शक्य नाही.

आजपर्यन्त सूक्ष्मशरिररुपी आत्म्याच्या अस्तित्वाचा कसलाही पुरावा शरिर शास्त्रज्ञांना मिळालेला नाही. मृत्यू म्हणजे काय ? मृत शरिराची घटना बदलते. त्याचे रासायनिक विघटन (Chemical Decomposition) होते. या अर्थाने शरिर अविनाशी म्हणता येईल. शरिर हा पदार्थ आहे आणि पदार्थ नाश पावत नाही तर त्याचे दुसऱ्या पदार्थात रुपांतर होते. पण सूक्ष्मशरिररुपी आत्म्याला जर स्मृति टिकवायची असेल तर त्यांचे विघटन होता कामा नये. असा विघटित न होणारा अंगठ्याएवढा आत्मा निरीक्षणातून सुटणे शक्य नाही. असा आत्मा अस्तित्वात असल्याचा पुरावा वैज्ञानिकांना मिळालेला नाही. म्हणून सूक्ष्मशरिररुपी आत्म्याची संकल्पना खोटी आहे असे ठामपणे म्हणता येईल. यातून पळवाट कशी काढावयाची? मग देहभिन्न आत्म्याची संकल्पना चतुर मंडळीनी मांडली.

## देहभिन्न आत्म्याची संकल्पना –

देहभिन्न आत्म्याचे स्वरुप काय मानले गेले आहे ? असा आत्मा फक्त शरिरात वास करतो. शरिराचे कोणतेही गुणधर्म त्याला चिकटत नाही. पिंजऱ्यात जसा पक्षी तसा हा आत्मा. पक्षी पिंजऱ्यापेक्षा सर्वस्वी भिन्न. पिंजरा उघडला की पक्षी उडून जातो. शरीर मृत झाले की आत्मा त्याच्यातून उडून जातो. शरीर म्हणजे आत्म्याचे वस्त्र. जुने वस्त्र फेकून दिले, नवीन वस्त्राने शरीर झाकले तसे शरिररुपी जुने (मृत) वस्त्र फेकून देऊन आत्मा दुसऱ्या शरिराचे वस्त्र धारण करतो. (दुसऱ्या शरिरात प्रवेशतो). मात्र पहिल्या शरिरात असतानाच्या स्मृति हा आत्मा बरोबर घेतो.

आत्मा स्मृति बरोबर नेतो याचा अर्थ काय ? मानवी स्मृतिचा उगम मेंदूत असतो. मेंदूत विशिष्ट ठिकाणी स्मृतिकेंद्र असते. त्यास इजा झाली अगर धक्का बसला तर माणसाची स्मृति जाते. स्मृति ही शारिरीक (Physiological) वस्तुस्थिती आहे. हेच दुसऱ्या भाषेत सांगायचे तर शरिरपेशी (Brain cells) शिवाय स्मृति संभवत नाही. म्हणजे आत्म्याबरोबर स्मृति विनाश पावत नसेल, ती आत्म्याला चिकटून शरिराबाहेर पडत असेल तर आत्मा स्मृतिपेशी (शरिर) धारण करतो असा निष्कर्ष काढावा लागेल. पण आत्मा तर अशरिरी आहे असे आपण मानतो. अशा रितीने मूळ उपपत्तिच चुकीची ठरते. शरिर विनाश पावले तर स्मृति मागे उरणे शक्य नाही. कारण शरिराबरोबर मेंदू नष्ट होतो. म्हणून स्मृति नष्ट होते. आत्मा स्मृति



बरोबर घेऊन जातो असे म्हणावे तर अशरिरी आत्म्याची संकल्पना गळून पडते. हे म्हणजे ज्या फांदीवर आपण बसलो तिलाच तोडण्यासारखे झाले.

देहभिन्न व अशरिरी आत्मा (Disembodied Spirit) शक्य नाही. सूक्ष्म शरिररुपी आत्मा संभवत नाही मग आत्मविष्काराचे नक्की स्वरुप काय ? यासाठी शरिर विज्ञान नीट समजून घ्यावयास हवे.

## मानसिक आविष्काराचे स्वरुप –

मानवाला भावना, बुध्दि आणि स्मृति असते. ही सर्व मानसिक आविष्काराची स्वरुपे होत. भावना, बुध्दि आणि स्मृति यांचा उगम मानवी मेंदूत आहे. डब्ल्यू. आर. हेस. या नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञाने मनाच्या स्वरुपावर मौलिक संशोधन केले आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर

"From clinical experience as well as experiments on animals we know that certain behaviour patterns are associated with well defined areas in brain. Through electrical stimulation of brain stem and contigeous areas we can elicit the reactions of defence fight and hunger ....... through stimulation of the certex, visiual and auditory reactions among others"

Life Science Library

Book "The Mind"

## हेसच्या प्रयोगातून काय निष्कर्ष निघतो ?

प्राण्यांच्या मेंदूत ठराविक ठिकाणी अशी मनोविष्काराची केंद्रे आहेत. संरक्षण संघर्ष, भूक यांची जाणीव करून देणारी केंद्रे, श्रवण व दृष्टि केंद्रापेक्षा वेगळ्या ठिकाणी असतात. विद्युत उद्दीपनाने भुकेचे केंद्र उद्दीपीत केले तर त्या प्राण्यात भुकेची लक्षणे येतात इ.

भावना, बुध्दि, स्मृति यांची केंद्रे मेंदूत वेगवेगळ्या जागी असल्यामुळे मन ही समुच्चयबोधक कल्पना ठरते. मेंदू व शरीरभर पसरलेली वेगवेगळी इंद्रिये चेतासंस्थेने जोडलेली असतात. चेतासंस्थेतील मज्जातंतूचे जाळे सर्व शरिरभर पसरलेले असते. चेतासंस्था विद्युत-रासायनिक प्रक्रियेद्वारे संदेशाचे वहन करते व परिणाम म्हणून मानसिक आविष्कार घडतात. मन हे अशारितीने शरिरभर विखुरलेल्या स्वरुपात आहे असे मानावे लागेल. ते समुच्चय बोधक आहे.

भारत सरकार म्हणजे काय ? पंतप्रधान म्हणजे भारत सरकार नव्हे. पार्लमेंट, संरक्षण विभाग, रेल्वे विभाग, शेती विभाग इ. या सर्वांचे मिळून भारत सरकार बनले आहे. भारत सरकार दाखवा म्हटले तर आपण पंतप्रधानाकडे बोट दाखवू शकत नाही कारण राष्ट्रपती व सुप्रीम कोर्ट न्यायाधीश ही पण सरकारचीच अंगे होत. भारत सरकार भारतभर आहे. त्याची मुख्य नियंत्रण व्यवस्था दिल्लीत आहे. दिल्लीहून संदेश सुटतात. दिल्लीला संदेश येतात. तद्वत मेंदूतून संदेश सुटतात व मेंदूकडे संदेश येतात.

मानवी शरीर पेशींचे बनलेले आहे. प्रत्येक पेशी ही जिवंत प्रणाली आहे. जीव व मन यांच्या संयोगातून आत्मविष्कार घडतात. वासना, स्मृति इ. आत्म्याची लक्षणे म्हणजे जिवंतपणी घडत रहाणाऱ्या मानसिक प्रक्रिया होत. म्हणून आत्मा म्हणजे जीव आणि मन यांच्या संयोगाचा आविष्कार होय.

The so called soul is a combination of both life and mind. Since life and mind can not survive the body, it is meaningless to talk about 'an everlasting life' or 'an immortal soul.'

Begone Godmen

By A. Kovoor

जेव्हां माणूस मरतो तेव्हा शरिराला होणारा उर्जा पुरवठा थांबतो. परिणामतः शरीरपेशी नष्ट होतात. मेंदू पेशी पण नाश पावतात. अशा रितीने मन व जीव विनाश पावतात. म्हणजे आत्म्याचाही नाश होतो. म्हणून आत्मा अमर नाही. तो देहमय आहे. देह संपला की तो संपतो. मेणबत्ती जळते तेव्हा मेणरुपी उर्जा वातीला पुरविली जाते व ज्योत तेवत राहते. मेण संपले की ज्योत संपते. आपण ज्योत उडून गेली असे म्हणू काय ? एक मेणबत्ती विझताना ज्योत उडाली व शेजारी पडलेल्या मेणबत्तीत ती शिरली व दुसरी मेणबत्ती तेवू लागली हे कुणी पाहिले आहे का ?

देहाहून वेगळ्या आत्म्याचे अस्तित्व अनुभवास येत नाही, चेतन देह हाच आत्मा हा देहात्मवाद चार्वाक पंथाच्या विचारवंतानी प्राचीन काळी मांडला होता. पण आत्मा स्वतंत्र व अमर मानणाऱ्या वैदिक पंथीयांनी त्यांना प्रखर विरोध केला व आपले हितसंबंध जपण्यासाठी त्यांचे ग्रंथ नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण विज्ञानाच्या कसोटीवर चार्वाकांचा देहात्मवादच अखेरीस मान्य करावाच लागेल.

☆☆☆



# ४ - पुनर्जन्म - चिकित्सा

## पुनर्जन्म असंभव -

शरीरनिवासी पण शरिराहून वेगळा स्वतंत्र असा आत्मा संभवत नाही. त्यामुळे एका शरिरातून आत्मा दुसऱ्या शरिरात प्रवेश करतो हे शक्य नाही. म्हणून पुनर्जन्म संभवत नाही.

ख्रिश्चन व मुस्लिम पुनर्जन्म मानीत नाहीत. पुनर्जन्माची कल्पना हिंदूपुरतीच मर्यादित आहे. इथेही एका प्रश्नाला वेगवेगळी उत्तरे कशी ? पुनर्जन्म असंभव हेच खरे.

## छापून आलेले खोटे कसे ?

पुनर्जन्माबद्दलच्या हकिगती मासिकातून, पेपरमधून छापून येतात. त्या खोट्या कशा असतील असा प्रश्न नेहमी विचारला जातो. या हकिगतीबाबत नीट तपास केला तर खालील गोष्टी उजेडात येतात.

(१) वार्ताहरांनी ऐकिव माहिती छापलेली असते. ऐकिव माहिती विश्वसनीय पुरावा म्हणून ग्राह्य धरता येत नाही.

(२) ज्यांनी पुनर्जन्माच्या घटनेचा तपास केला ते लोक पूर्वग्रह बाळगून असतात. पुनर्जन्म असतोच असा ठाम विश्वास असेल तर पुनर्जन्माच्या घटनेबाबतच्या तपशिलातून अनुकूल भाग स्विकारला जातो. प्रतिकूल पुरावा हा दुर्लक्षित केला जातो किंवा गाळून टाकला जातो.

(३) जी प्रामाणिक मंडळी पुनर्जन्माचा वस्तुनिष्ठपणे शोध घेण्याचा प्रयत्न करतात ती देखील फसू शकतात. हे मानसशास्त्रीय सत्य आहे.

## मार्सटनचा प्रयोग -

मार्सटन हा अमेरिकन मानसशास्त्रज्ञ. त्याने खालील प्रयोग केला.

प्रयोगकर्ता ज्या खोलीत होता त्या खोलीत १८ सुशिक्षित व्यक्ति हजर होत्या. यापैकी बहुतेक निष्णात वकील होते. या सर्वांना खोलीत प्रयोग केला जाणार आहे याची पूर्वकल्पना दिलेली नव्हती. ते सर्वजण नेहमीप्रमाणे एकमेकांशी गप्पा मारीत बसले होते. काही वेळाने, प्रयोगकर्त्याने नियोजन केल्याप्रमाणे सर्वांचे लक्ष वेधून घेईल अशा पोशाखातील एक तरुण खोलीत घुसला व त्याने एक पिवळ्या रंगाचे पाकिट प्रयोगकर्त्याच्या हातात दिले. प्रयोग करणारा जेव्हा पाकिटातील मजकूर वाचण्यात मग्न होता तेव्हा पाकिट घेऊन येणाऱ्या इसमाने अगोदर सूचना दिल्याप्रमाणे सर्वांना दिसेल अशा पद्धतीने खिशातून धारदार मोठा सुरा काढून हातात धरला. डॉ. मार्सटन लिहितात, ''अठराजणांपैकी एकाच्याहि सुरा उगारल्याचे लक्षात आले नाही. त्यांचे सर्व लक्ष पिवळ्या पाकिटातील तारेच्या पेपरवर होते. जेव्हा सुऱ्याबद्दल नंतर या सर्वांना विचारणा केली तेव्हा सर्वांनी सुरा पाहिल्याचे नाकबूल केले. उटलतपासणी घेतेवेळी तर प्रत्येक जण सुरा न पाहिल्याचे अभिनिवेशाने सांगू लागला. त्या सर्वांना प्रयोगकर्ता आपणाला मूर्ख बनवित असल्याचा संशय आला. तो सुरा जवळ जवळ ३ मिनिटे सर्वांना स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने धरला होता.''

वरील प्रयोगावरून सत्य संशोधन किती अवघड आहे याची कल्पना येते.

## ऑसेज (Aussage) चाचणी -

ही गमतीशीर मानसशास्त्रीय चाचणी आहे. वर्गात विद्यार्थ्यांना ते समोर जे काही पाहतील ते लिहून ठेवण्यास सांगितले जाते. प्राध्यापक विविध प्रकारच्या घटना वर्गात घडवून आणण्याची व्यवस्था करतो. या सर्व घटनांचे विद्यार्थ्यांनी अचूक वर्णन लिहावे ही अपेक्षा असते. पण अनेकजणांचे रिपोर्टस इतके चुकीचे आढळतात की आश्चर्य वाटावे. म्हणजे डोळे असून पहाता येते की नाही इतपत शंका यावी ? एक घटना अशी - अनेक जण जोरजोरात हातवारे करून, शिवीगाळ करताहेत. ही घटना अनेक जणांनी नोंदली नाही. असे कांही घडले आहे असे त्यांना सांगितले तरी देखील त्या सर्वांनी असे काही घडलेच नाही असे ठामपणे सांगितले. एकूण अशा तऱ्हेच्या १५० घटनांपैकी फक्त ४१ घटनांची विद्यार्थ्यांनी नोंद घेतली. यातून जो निष्कर्ष निघतो तो अत्यंत महत्वाचा ठरतो. एखाद्याचे लक्ष एखाद्या घटनेवर केंद्रित झाले असेल तर त्याचवेळी घडत असलेल्या इतर घटनांकडे



आपले लक्ष जात नाही. हे सर्व परिस्थिती आणि मनाची घडण यावरुनच निश्चित होत असावे.

आपण फसत असतो. म्हणून पुनर्जन्मासारख्या घटनेचा पडताळा पाहताना किती काळजी घेतली पाहिजे ? प्रत्यक्ष पाहिले असा जे दावा करतात त्यांचे पाहणे वरवरचे असू शकते व ज्या घटना त्यांच्या नजरेतून निसटतात त्या अत्यंत महत्वाच्या ठरू शकतात. म्हणून पुनर्जन्माच्या पुरावा शोधणाऱ्या व्यक्ति ह्या पूर्वग्रह दूषित नसाव्यात आणि निरीक्षणातून काहीही निसटू न देण्याची काळजी घेण्यात आली पाहिजे.

डॉ. अब्राहम कोवूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीलंकेच्या बुद्धिप्रामाण्यवादी मंचाने संशोधन केलेली पुनर्जन्माची केस समजून घेतली तर अशा घटना कशा तपासाव्यात याचे आकलन आपणांस होईल.

## फ्रॅन्सिसचा पुनर्जन्म -

फ्रॅन्सिस हा मातारा गावातील रहिवासी. १६ एप्रिल १९७३ रोजी तो वारला. त्यावेळी त्याचे वय ५२ वर्षाचे होते. फ्रॅन्सिसच्या घरापासून अंदाजे ३०० यार्ड अंतरावरील घरात ३ वर्षाचा मुलगा म्हणून फ्रॅन्सिसचा पुनर्जन्म झाला आहे अशी बातमी मोठ्या मथळ्याखाली पहिल्या पानावर, दि सन (The Sun), वीकएंड (Weekend) या मोठ्या खपाच्या पेपरमधून झळकली.

वर्तमानपत्रातील बातम्याप्रमाणे, काही बुद्ध भिक्षू व इतर अनेक पुनर्जन्माचे शोध घेणारे संशोधक यांनी ही केस तपासून ती खरी असल्याचा निर्वाळा दिला होता. वर्तमानपत्रांतील रिपोर्टमध्ये पुढे लिहिले होते की - 'पुनर्जन्मातील मुलाला अनेक तज्ञांनी विविध तऱ्हेने प्रश्न विचारले. या प्रश्नात, हे मूल फ्रॅन्सिस हयात असताना त्याचे जीवन, त्याची पत्नी व मुले, त्याच्या ऑफिसमधील मित्र इत्यादिंचा समावेश होता. या प्रश्नांची मुलाने जी उत्तरे दिली ती १०० टक्के खरी निघाली.'

या केसचा वर्तमानपत्रातील रिपोर्ट वाचल्यावर लोकांसमोर सत्य काय तेच यावे म्हणून श्रीलंकेच्या बुध्दिप्रामाण्यवादी मंचाने या केसची तपासणी करण्याचे ठरविले. या मंचाचे सभासद मि. व मिसेस तिलकरत्ने यांनी हे शोधाचे काम हाती घेतले.

१३ मे १९७७ रोजी मिसेस तिलकरत्ने व इतर चार सभासद यानी मातारा गावाला भेट दिली. यावेळी खालील लोकांच्या सविस्तर मुलाखती घेतल्या गेल्या.

(१) मयत फ्रॅन्सिसची पत्नी सुमनावती (२) मि. सुगथापला, पुनर्जन्म पावलेल्या मुलाचा बाप (३) मातारा येथील ज्या सरकारी कचेरीत फ्रॅन्सिस नोकरी करीत होता, त्या कचेरीतील त्याचे चार कारकून मित्र (५) फ्रॅन्सिसची ६ पैकी ३ मुले (५) पुनर्जन्म झालेला मुलगा

या संशोधनाचे वेळी मुलगा (Reborn) साडेतीन वर्षाचा होता. फ्रॅन्सिस वारल्यानंतर ७ महिन्यांनी तो जन्माला आल्याचे आढळले.

शोध घेणारी पार्टी प्रथम, मातारा येथील फ्रॅन्सिस जेथे नोकरी करत होता, त्या ऑफिसमध्ये गेली. तेथील सरकारी अधिकाऱ्याने या संशोधनासाठी पार्टीला पूर्ण सहकार्य देऊ केले.

फ्रॅन्सिसच्या ऑफिसमधील सहकारी मित्रांकडून जी माहिती मिळवायची ती मिळविल्यावर पार्टीने मुलाच्या (Reborn) घराला भेट दिली. तिलकरत्ने पती-पत्नीनी मुलाला भेट म्हणून द्राक्षे नेली होती. हेतू हा की मुलगा विश्वासात यावा व त्याने सहजपणाने न संकोचता उत्तरे द्यावी. याठिकाणी बराच वेळ प्रश्नोत्तरे झाल्यावर मुलाला फ्रॅन्सिसच्या घरी नेण्यात आले. नंतर त्याला फ्रॅन्सिसच्या ऑफिसमध्ये नेले. या जागा मुलाला नव्या नव्हत्या. कारण या अगोदर बऱ्याच वेळा याच संशोधनासाठी त्याला या ठिकाणी नेण्यात आले होते. या सर्व वेळी मुलाचे वडील सुगथापला त्याच्याबरोबर होते.

## प्रश्नोत्तरे खालीलप्रमाणे झाली.

प्रश्न - तुझे नांव काय ?
उत्तर - फ्रॅन्सिस.

प्रश्न - तुझे वय काय ?
उत्तर - ४९ (फ्रॅन्सिस ५२ व्या वर्षी वारला. मुलाचे आताचे वय साडे तीन वर्षे)

प्रश्न - तुझे लग्न झालंय ?
उत्तर - होय.

प्रश्न - तुझे वय ४९ हे तुला कसे कळाले ?
उत्तर - मला माहित नाही.

प्रश्न - तुझे शिक्षण कितवीपर्यंत झाले आहे ?
उत्तर - मला माहित नाही.

प्रश्न - तुला मुली जास्त का मुलगे जास्त ?



उत्तर - मुली जास्त.

प्रश्न - मुलगे किती ?
उत्तर - पुष्कळ.

प्रश्न - त्यांची नांवे सांगशील ?
उत्तर - सुसीथा, पतीया.

प्रश्न - सर्वात धाकटी कोण ?
उत्तर - मला माहित नाही.

प्रश्न - तुझ्या बायकोचे नाव काय ?
उत्तर - मला माहित नाही.

प्रश्न - तू काय काम करीत होतास ?
उत्तर - माहित नाही. नंतर सांगेन.

प्रश्न - तुझ्या आईचे नाव काय ?
उत्तर - इव्हॅलीन (हे त्या मुलाच्या आत्ताच्या आईचे नाव)

प्रश्न - तू तुझ्या पगाराचे काय केलेस ?
उत्तर - पगार हरवला.

प्रश्न - तू रोज ऑफिसला कसा जातोस?
उत्तर - मोटर सायकलने.

प्रश्न - मोटर सायकल कोणत्या मेकची ?
उत्तर - माहित नाही. नंतर सांगेन.

प्रश्न - तू कोणत्या शाळेत जात होतास ?
उत्तर - माहित नाही. नंतर सांगेन.

प्रश्न - तू पोशाख काय करीत होतास ?
उत्तर - बेल बॉटम्

प्रश्न - तुला त्यावेळी काय आवडत असे ?
उत्तर - द्राक्षे

प्रश्न - फ्रॅन्सिसच्या वडिलांचे नाव काय ?
उत्तर - माहित नाही.

प्रश्न - या अगोदरच्या जन्मात तुला कोणते पेय आवडायचे ?
उत्तर - ॲरक (Arrack)

प्रश्न - ॲरकसाठी पैसे कुठून मिळत ?
उत्तर - लोक मला द्यायचे.

प्रश्न - ॲरक पिण्यासाठी तुझ्याबरोबर कोण-कोण मित्र असत ?
उत्तर - माहित नाही.

प्रश्न - ऑफिसमध्ये तुला मित्र होते ?
उत्तर - होय.

प्रश्न - त्यांची नावे काय ?
उत्तर - माहित नाही. नंतर सांगेन.

प्रश्न - ऑफिसमधील तुझा जिवलग मित्र कोण होता ?
उत्तर - माहित नाही. नंतर सांगेन.

प्रश्न - फ्रॅन्सिस कोणत्या धर्माचा होता ?
उत्तर - माहीत नाही.

प्रश्न - फ्रॅन्सिसच्या बायकोचे नाव काय ?
उत्तर - सुमनावती.

यानंतर मुलाला फ्रॅन्सिसच्या घरी नेण्यात आले. गेले काही दिवस मुलगा जवळजवळ रोजच फ्रॅन्सिसकडे नेला जात होता. सुमनावती व तिची तीन मुले यावेळी घरी होती. फ्रॅन्सिसला ६ मुले होती. त्यातील पहिले तीन मुलगे व शेवटच्या तीन मुली होत्या. सुमनावतीचे आजचे वय ५०.

मुलाने (Reborn) फ्रॅन्सिसच्या दोनच मुलांना (रासीका व पटिया) आपली पूर्व जन्मातील मुले म्हणून ओळखले. फ्रॅन्सिस ज्यात आहे असा एक फोटो मुलाला दाखविण्यात आला. पण त्यातील फ्रॅन्सिस कोण हे त्याला ओळखता आले नाही. पण त्याने फोटोतील सुमनावतीला ओळखले. जेव्हां मुलांचा ग्रुप फोटो त्याला दाखविण्यात आला तेव्हा त्या फोटोतील अशोक, रासीका, महिंद्र व आनंद यांना तो ओळखू शकला नाही.

धर्मदास नावाचे गृहस्थ एक वर्षभर फ्रॅन्सिसच्या घरी रहात होते. ते फ्रॅन्सिसचे जिवलग मित्र होते. धर्मदासचा फोटो त्याला दाखविल्यावर धर्मदासचे नाव तो सांगू शकला नाही.

फ्रॅन्सिस ज्या कचेरीत काम करत होता त्या ऑफिसमधील सिनियर गृहस्थ रिटायर होताना सर्व ऑफिस सहकाऱ्यांचा एक ग्रुप फोटो काढला होता.



(जवळजवळ ३० जण या फोटोत होते. हा फोटो यापूर्वी मुलाला दाखविण्यात आला नव्हता.) या फोटोतील एकाही व्यक्तिला (खुद्द फ्रॅन्सिसला सुध्दा) मुलगा ओळखू शकला नाही. फ्रॅन्सिस बरोबर २० वर्षे सहकारी म्हणून काम केलेल्या गुणवंत या गृहस्थाला मुलगा ओळखू शकला नाही.

एकदा फ्रॅन्सिस व ऑफिस सहकाऱ्यांनी तीर्थयात्रा केली होती. त्याबद्दल मुलाला विचारले, त्याला याबद्दल काहीही सांगता आले नाही.

नंतर मुलाला फ्रॅन्सिसच्या दुसऱ्या अरीदास नावाच्या मित्राकडे नेण्यात आले. पण त्यालाही मुलगा ओळखू शकला नाही.

या सर्व संशोधनाचा आमचा हेतू एवढाच होता की मुलगा (Reborn) पूर्वजन्मीच्या म्हणून ज्या आठवणी व माहिती सांगतोय त्यात वस्तुनिष्ठ तथ्य वा सत्य किती ? जर ही पुनर्जन्माची केस असेल तर या मुलाने आमच्या ७० प्रश्नांची बिनचूक उत्तरे द्यावयाला हवी होती व आम्ही दाखविलेल्या फोटोतील व्यक्ति ओळखायच्या होत्या. पण निष्कर्ष पूर्णपणे निराशाजनक होता. ७० पैकी फक्त ९ प्रश्नांची उत्तरे मुलाने बरोबर दिली.

७० प्रश्नांपैकी ६१ प्रश्नांची उत्तरे चुकीची ठरली. अशा निराशाजनक निष्कर्षामुळे मि. तिलकरत्ने व त्यांचे सहकारी यांना पूर्वीच्या मंडळींनी शोधलेली व खरी ठरविलेली, वर्तमानपत्रातून गाजलेली पुनर्जन्माची केस नाकारावी लागली.

एखाद्या खोट्या साक्षीदाराची कोर्टात चतुर वकीलाच्या उलट तपासणीचेवेळी जशी भंबेरी उडते तशी गत अनेक प्रश्नांच्या वेळी मुलाची झाली. प्रश्नोत्तरावरून हे आमच्या लक्षात आले होते की ज्या प्रश्नाचे उत्तर माहित नाही त्याला मी नंतर सांगेन असे उत्तर देण्यासाठी मुलाला पढविले गेले होते.

मातारा ऑफिसमधील ग्रुप फोटो जेव्हा मुलाला दाखविला तेव्हा त्यातील फ्रॅन्सिस किंवा त्यांचा कोणताही सहकारी मुलाला ओळखता आला नाही. याचे कारण हा फोटो तो मुलगा प्रथमच पहात होता पण फ्रॅन्सिसच्या घरच्या ग्रुप फोटोतील एक दोन मुलांची नावे त्याला सांगता आली कारण तो फोटो त्याला दाखविला गेला होता व फोटोतील नावे त्याला सांगितली होती. ही एकच कसोटी ही केस पुनर्जन्माची नसून बनवाबनवी आहे हे सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

☆☆☆

# ५ - झाशीच्या राणीचा पुनर्जन्म

२५ ऑगस्ट १९८६ च्या सातारा येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'ऐक्य' मधून बातमी झकळली 'झाशीच्या राणीच्या पुनरावतार असलेल्या सौ. सहस्त्रबुद्धे यांचे व्याख्यान. स्थळ - नगर वाचनालयाचा पाठक हॉल. वेळ - दि. २६-८-१९८६ सायंकाळी ६ वाजता.'

बातमीत पुढे म्हटले होते की, 'सांगलीच्या सौ. शरयू सहस्त्रबुद्धे स्वतः झाशीच्या राणी लक्ष्मीबाईचा पुनरावतार असून आपल्या पूर्वजन्मातील स्मृति त्यांच्यात जाग्या झालेल्या आहेत. या स्मृतिबाबतचे अनुभव त्या व्याख्यानात सांगणार आहेत.'

सातारा अंधश्रद्धा निर्मूलन समितीची आठवड्यातून एकदा मुक्तांगण सभागृहात मिटींग असते. त्या मिटींगसाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. खुटाळे कुमार मंडपे, मी व इतर कार्यकर्ते जमा झालो असताना झाशीच्या राणीचा स्वतःला पुनरावतार समजणाऱ्या सौ. सहस्त्रबुध्दे यांच्या कार्यक्रमाबाबत चर्चा सुरु झाली. डॉ. दाभोळकरांनी सांगितले की अशा तीन झाशीच्या राण्या सध्या सांगलीत प्रसन्न दाभोळकरांच्या सायकियाट्रिस्ट (मनोविकार तज्ञ) मित्राकडे उपचार घेत आहेत. (प्रसन्न दाभोळकर हे स्वतः सायकियाट्रिस्ट आहेत.) म्हणजे सौ. सहस्त्रबुद्धे या मनोरुग्ण असल्याचे सर्वांच्या लक्षात आले.

माणसाला जे विविध भ्रम होतात त्यात Delusion हा एक भ्रम आहे. Delusion म्हणजे False Belief स्वतःबद्दल चुकीचा ग्रह वा समज. या प्रकारच्या भ्रमाची अनेक कारणे असतात. ही एक प्रकारची मनोविकृती असते.

सहस्त्रबुद्धे बाईंच्या सभेला जायचे ठरले. सभेस जाणेपूर्वी झाशीच्या राणीचे चरित्र सखोल अभ्यासून काही खोचक प्रश्न तयार करण्याचे ठरले. हेतू असा की, सहस्त्रबुद्धे खरोखरच झाशीच्या राणीचा पुनरावतार असतील तर राणीच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगाची व घटनेची त्यांना स्मृति येणे क्रमप्राप्त होते. झाशीच्या



राणीचे चरित्र पाठ करून ते व्याख्यानात उपयोगात आणण्याची शक्यता होती.

कुप्रसिद्ध खुनी रामन राघव याला परमेश्वराने खास कार्य करण्यासाठी व जगाच्या उद्धारासाठी आपणास पृथ्वीवर पाठविले असे वाटत असे. या मनोविकारास पॅरानॉईड सिझोफ्रेनीया असे नाव आहे.

सभेस जमलेल्या नागरिकांना या प्रकारच्या आजाराची कल्पना असावी व नागरिकांनी सौ. सहस्त्रबुद्धे यांच्या भाषणाची चिकित्सा करावी या उद्देशाने समितीने एक पत्रक छापले. ते असे,

**झाशीच्या राणीचा पुनर्जन्म - बुध्दिभेद**

"आपण झाशीच्या राणीचा पुनर्जन्म असून आपली त्यावेळची पूर्वस्मृति जागी झाली आहे असा दावा सांगलीच्या सौ. शरयू सहस्त्रबुद्धे करत आहेत. लोकांच्या भावनांशी खेळण्याचा, अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा व मानसिक आजाराचे उदात्तिकरण करण्याचा हा गंभीर प्रकार आहे. हा प्रकार त्वरित बंद व्हावा अशी मागणी सातारा अंधश्रद्धा निर्मूलन समिती करीत आहे.

देशासाठी लढताना ज्यांना वीरगती मिळते ते जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतात असा या देशाचा परंपरागत धर्म सांगतो. झाशीच्या राणीसारख्या वीरांगनेला त्यामुळे मोक्ष मिळाला असणार हे उघड आहे. अशा वेळी तिला पुन्हा जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकवणे हा लोकांच्या धर्मभावनेशी खेळण्याचा घातक प्रकार आहे.

या पलिकडे जाऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितले तर काय दिसते ? एखादी देवी, बाबा, मृत व्यक्ति ठराविक दिवशी अंगात आणतात. काही काळ अंगात येणे हा 'हिस्टेरिया' या मनोविकाराचा भाग आहे. मात्र आपणच अशी पूर्वजन्मीची मृत व्यक्ति आहोत असे मानणे हा त्याच्या पुढच्या पायरीचा विकार आहे. त्याला वैद्यकीय भाषेत 'पॅरॉनाईड सिझोफ्रेनीया' असे नाव आहे. अशा मनोआजाराचे जाहीर प्रदर्शन आक्षेपार्ह आहे.

पिसाट खुनी रामन याला हाच मनोविकार होता. जगाच्या उद्धारासाठी परमेश्वराने आपणास पृथ्वीवर पाठविले असे तो मानत असे. त्याचे वर्तन वेड्यासारखे नसे तर सुसंगतच वाटत असे. परंतु या मनोविकारामुळेच त्याने निर्घृण खून केले. गोष्टी कोणत्या थराला जाऊ शकतात याचे हे उदाहरण आहे.

पुनर्जन्म ही गोष्ट विज्ञानाने पूर्णतः ना-शाबीत झाली आहे. जगातील कोणत्याही ज्ञानकोशातील संदर्भ बघितल्यास हे सहज समजेल. राजस्थान विद्यापीठाने संशोधन करून हाच निष्कर्ष काढला आहे. माणसाची बुध्दि, स्मृति,

भावना, जाणिवा या सर्व गोष्टी त्याच्या मेंदूच्या पेशीत असतात. मृत्यूनंतर मेंदू नष्ट होतो. त्यावेळी या गोष्टी संपतात. काहीही मागे उरत नाही. हे वादातीत वैज्ञानिक सत्य आहे. त्यामुळे आत्मा व त्या आधारे होणारा पुनर्जन्म ही गोष्ट शास्त्रीयदृष्ट्या अशक्य आहे.

तेव्हा एखाद्या महत्वाच्या व्यक्तिचा आपण पुनर्जन्म आहोत हे सांगणे मनोविकार तरी आहे किंवा ढोंग तरी आहे. काहीही असले तरी ही लोकांची गंभीर दिशाभूल आहे.''

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाठक हॉल स्त्री-पुरुषांनी गच्च भरुन गेला. 'महाराष्ट्र मित्र' या दैनिकाचे संपादक संजय कोल्हटकर व 'ग्रामोद्धार' दैनिकाचे संपादक बापू जाधव सभेच्या ठिकाणी हजर होते. आम्ही सर्व कार्यकर्ते एकेक प्रश्न मनाशी ठरवून सभागृहात बसलो.

सौ. शरयू सहस्त्रबुद्धे आल्या. सभेचे अध्यक्ष आले. प्रास्ताविक झाल्यावर सहस्त्रबुद्धे बाई बोलायला उठल्या. सुरवातीला बाई म्हणाल्या, 'मला डायबेटिस आहे. बोलताना धाप लागते. मी माझ्या पूर्व स्मृति थोडा वेळच सांगेन. बाईत राणीच्या स्मृति जाग्या झाल्यावर बाई तलवार फिरवीत आवेशात बोलायला हव्या होत्या. पण बाईंच्या बोलण्यात चक्क पाठ केलेले भाषण होते. ही बनवेगिरी होती.'

लोकांनी बाईंचे भाषण शांतपणे ऐकून घेतले. नंतर प्रश्नोत्तरांना सुरुवात झाली आणि प्रत्येक प्रश्नातून बाईंचे पितळ उघडे पडायला लागले.

महाराष्ट्र मित्र दैनिकाचे संपादक संजय कोल्हटकर सावरकरवादी. त्यांना हा फालतू प्रकार अजिबात रुचला नाही. ते म्हणाले, 'बाई, आता तुम्ही झाशीच्या राणीचे जन्मगांव धावडशीचा उल्लेख केलात. त्या गावातील तांबे नावाचे राणीच्या घराण्याशी संबंधीतजे गृहस्थ आहेत त्यांना तुम्ही दोन दिवसांपूर्वी भेटलात व धावडशीविषयी माहिति विचारलीत. नंतर तुम्ही धावडशीला जाऊन राणीचे आजोळाविषयी तपशीलवार माहिति मिळविलीत. तीच तुम्ही भाषणात सांगता आहात.' त्यावर बाई चपापल्या. 'मी धावडशीला गेले होते खरे पण माझ्या स्मृतिंचा पडताळा पहाण्यासाठी' बाईंनी उत्तर दिले. मी कोणाही व्यक्तिला साताऱ्यात भेटले नव्हते. त्यावर कोल्हटकर म्हणाले, 'तुम्ही ज्या गृहस्थांना भेटला ते तांबे इथेच खाली आहेत. त्यांना बोलवून आणू काय ?' यावर बाई गप्प बसल्या.

सभेत हंशा पिकला. म्हणजे बाई ग्रंथ, व्यक्ति व प्रत्यक्ष ठिकाणांना भेटी देऊन राणीची मिळविलेली माहिति त्या भाषणात सांगत होत्या तर ! हा कसला पुनरावतार ? ही तर बनवेगिरी ! कशासाठी ही बनवेगिरी ? बाईंच्या भाषणातच



याचे उत्तर होते. भाषणात त्यांनी सांगितले, 'त्यांचा दत्तक मुलगा (राणीचा) सध्या कर्नाटकात आहे. तो लहान आहे. परंतु तो तरुणपणी हिंदुराष्ट्र निर्मितीच्या कार्यात आघाडीचा नेता होणार आहे. स्वतः सहस्त्रबुद्धे बाईंनी राणीच्या अपघाती मृत्यूमुळे तिची व्यक्तिगत अपूर्ण राहिलेली धार्मिक कृत्ये पूर्ण करण्यासाठी राणीने पुनरावतार घेतलाय असे भाषणात सांगितले. म्हणजे हिंदू धर्माच्या रक्षणासाठी राणीचा पुनरावतार झाला होता. डायबेटिसने धड चालताही न येणारी बाई हिंदू धर्माचे रक्षण करणार तरी कशी ?' श्रोत्यांचे मनोरंजन घडत होते.

श्रोत्यातील एक बाई उठून म्हणाल्या, 'बाई, तुम्ही पाठ करून आलेले बोलता आहात ?' सभागृहात जोरात हंशा.

यानंतर अनेक वक्त्यांनी बाईंवर प्रश्नांची सरबत्ती सुरु केली.

ग्रामोद्धारचे जाधव म्हणाले, 'राणीला मोडी येत होती. तुम्ही मोडी लिहून दाखवाल अगर वाचून दाखवाल काय ?'

त्यावर बाई उत्तरल्या 'आता, मी मोडी शिकायला सुरुवात करणार आहे.'

राणीच्या पूर्वस्मृति बाईंना येत होत्या. मग राणीला येत असलेले मोडी बाईंना कां येत नव्हते ? उत्तर सोपे होते. बाईंना पूर्वजन्माच्या स्मृति झाल्या नव्हत्या. त्यांनी इतिहास पाठ केला होता. यानंतर जगताप नावाचे कार्यकर्ते उठले. त्यांनी प्रश्न केला, 'बाबासाहेब पुरंदरेंना शिवाजी महाराजांचा इतिहास तोंडपाठ आहे. त्यांच्याबद्दलचे अनेक बारकावे माहित आहेत. ते इतरांना माहित नाहीत. ते जर म्हणाले की, आपण पूर्वजन्मीचे छत्रपती शिवाजी महाराज आहोत, तर काय होईल?' या प्रश्नाला बाईंनी काहीच उत्तर दिले नाही.

सभेचा नूर कळत होता. बाईंची बनवेगिरी लोकांनी उघडी पाडली होती. खोलात जाऊन प्रश्न विचारण्याचे कारणच नव्हते. अध्यक्षांच्या हे लक्षात आले. त्यांनी अध्यक्षीय समारोप न घेता सभा बरखास्त केली.

पुनर्जन्माचा दावा करणाऱ्या आजारी सहस्त्रबुद्धे बाईंचा केविलवाणा प्रयत्न असफल ठरला होता.

कच्चे दुवे हेरल्यास, पुनर्जन्माचा दावा करणाऱ्यांची कशी फजिती उडते याचा अनुभव सातारा अं. नि. समितीला नवाच होता.

अशा केसेसमधील विसंगती व कच्चे दुवे हेरुन काढणे हे अं. नि. समितीच्या कार्यकर्त्यांना जमले तर सहस्त्रबुद्धे बाईंप्रमाणे प्रयत्न करणारांचे पितळ उघडे पाडणे शक्य होईल.

☆☆☆

# ६ - हिप्नॉटिक रिग्रेशन आणि पुनर्जन्म

पुनर्जन्माचे संशोधन जगभर चालू आहे. हिप्नॉटिक रिग्रेशन तंत्राने पुनर्जन्म सिद्ध करण्याची लाट एका काळात पाश्चिमात्य देशात आली होती. व्यक्तिला संमोहित करून भूतकाळात घेऊन जाण्याचे तंत्र म्हणजे हिप्नॉटिक रिग्रेशन. संमोहक व्यक्तिला संमोहित करून प्रश्न विचारतो - 'तू आता १५ वर्षांचा झाला आहेस. त्या वेळचे आठव.' व्यक्ती १५ व्या वर्षातील अनुभव सांगायला लागते. नंतर 'तू १४ वर्षांचा झालास .....' असे विचारीत 'आता तू एक वर्षाचा झालास' व शेवटी 'आता तुमच्या जन्माअगोदरचे आठवा.... तुम्ही कोण होता ? .... कोठे होता ? ....' मग व्यक्ति आपले पूर्वजन्मातील अनुभव सांगायला लागते. हेच हिप्नॉटिक रिग्रेशन तंत्र.

हिप्नॉटिक रिग्रेशन तंत्राची सुरुवात १९५२ मध्ये ब्रायडे मर्फी (Briday Murphy) पुनर्जन्माच्या केसमधून झाली. या केसवर आधारित, बर्नस्टीन या लेखकाने लिहिलेल्या पुस्तकाच्या लाखो प्रति अमेरिकेत खपल्या. त्यावर चित्रपटही निघाला. परिणाम म्हणून अमेरिकेत हिप्नॉटिक रिग्रेशन तंत्राने पुनर्जन्म सिद्ध करण्याची लाटच आली.

ब्रायडे मर्फी केसनंतर २२ वर्षांनी पूर्वजन्माच्या दुसऱ्या केसने लोकांना आश्चर्याचा धक्का दिला. आयव्हर्सन नामक निर्मात्याने बी.बी.सी. वरून पूर्वजन्माच्या हकिगती प्रक्षेपित केल्या. यासाठी त्याने ब्लॉक्सहॅम टेपचा उपयोग केला. रिग्रेशन तंत्राने पूर्वजन्माच्या आठवणी साठविलेल्या या टेपस् होत्या. या टेपस्ना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळाली.

या टेपस् ब्लॉक्सहॅम नामक संमोहन तज्ञाने गोळा केल्या होत्या. डॉक्टर म्हणून अपयश आलेल्या ब्लॉक्सहॅमने उतारवयात आपले लक्ष संमोहन शास्त्राकडे वळविले. ब्लॉक्सहॅम हा प्रथमपासून पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा होता पण अगदी शेवटी शेवटी पुनर्जन्म सिद्ध करण्याच्या खटाटोपात त्याला रिग्रेशन तंत्राची कल्पना



सुचली.

आयव्हर्सनने ब्लॉक्सहॅमकडील ४०० टेपस् ऐकल्या. त्यातील ज्यांचा पडताळा घेता येणार नाही व ज्या खऱ्या की खोट्या हे सिद्ध करता येणार नाही अशा टेपस् त्याने नाकारल्या. खात्रीने पडताळा घेता येईल अशा फक्त २ टेपस्ची त्याने सखोल चिकित्सा केली. त्यातील पहिली केस जेम्स इव्हॅन्स या वेल्स मोलकरणीची.

इव्हॅन्सने रिग्रेशनमध्ये पूर्वजन्माच्या ६ आठवणी सांगितल्या. आयव्हर्सनने त्यापैकी पूर्वजन्माचे ३ तपशील तपासले. इ.स. १५०० मध्ये इव्हॅन्स ही एका राणीची दासी होती. तिसऱ्या शतकात ती लिव्होनिया नावाच्या एका शिक्षकाची पत्नी होती. १४५० च्या आसपास ती फ्रान्समध्ये जेक्स कूर या श्रीमंत व्यापाऱ्याची दासी होती. तिचे नाव ॲलिसन.

इ. स. तिसऱ्या शतकात कॉन्स्टॅटियस या रोमन सरदाराने ब्रिटन जिंकले व स्वतःला जिंकलेल्या भूमीचा गव्हर्नर म्हणून घोषित केले. त्यावेळी इव्हॅन्स ही टिटस याची पत्नी म्हणून जन्माला आली. टिटस हा कॉन्स्टॅटियस व त्याची पत्नी हेलेना यांच्या मुलाचा शिक्षक होता. या जन्मातील इव्हॅन्सचे नाव होते लिव्होनिया. लिव्होनियाच्या टेपवर नोंदलेल्या स्मृती खालीलप्रमाणे -

ब्रिटन जिंकल्यावर कॉन्स्टॅटिअस रोमला परतला. त्यानंतर ब्रिटनमध्ये बंडाचा कट शिजला. लिव्होनिया, टिटस व गव्हर्नर कुटुंबीय यांना यार्कहून व्हेरुलमला पळून जावे लागले. कॉन्स्टॅटियस परतला व त्याने बंडखोरांचा बिमोड केला. त्या काळात टिटस व इतर व्हेरुलमलाच राहिले. कॉन्स्टॅटियस विजयी झाला खरा पण रोमच्या बादशहाने त्याला आज्ञा केली की तू हेलेनाला घटस्फोट दे व मॅक्सीमिनस बादशहाची मुलगी थिओडोर हिच्याशी लग्न कर. कॉन्स्टॅटियसला ही आज्ञा पाळावी लागली. त्यामुळे हेलेना दुःखी झाली. तिने लिव्होनिया व टिटसबरोबर व्हेरुलमलाच रहायचे ठरविले. रोमन सैनिकांनी व्हेरुलमवर हल्ला केला. त्यात टिटसचा मृत्यू झाला. त्या धक्क्याने थोड्याच काळात लिव्होनिया वारली.

इ.स. १४५० च्या आसपास इव्हॅन्स, फ्रान्समध्यें ॲलिसन नावाची तरुण दासी होती. जेक्स कूर या श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरी ती काम करी. कूरच्या संदर्भात अगदी बारीक सारीक तपशील ब्लॉक्सहॅम टेपमध्ये नोंदला होता. (म्हणजे इव्हॅन्स ॲलिसन असतानाच्या तिच्या स्मृति या टेपवर होत्या.) राजमाता सॉरेल लुईस व दुसरा चार्लस राजा यांच्यामधील झगडा तिला इत्यंभूत आठवत होता. कूरची संपत्ति

व त्याचे बॉर्जसमधील भव्य घर याची पण तिला माहिती होती. आपल्या धन्याच्या पोशाखाचा बारीक सारीक तपशील तिला आठवत होता. उदा. बंडीची तांबडी किनार, तांबडे बूट, कमरेचा रत्नजडित पट्टा, गळ्यात सोन्याची साखळी इ.

राजाच्या मर्जीतून जेक्स कूर कसा उतरला व नंतर त्याची अधोगती कशी झाली याचे तिने केलेले वर्णन बिनचूक होते. कूर एकेकाळी राजाचा विश्वासू व जवळचा होता. पण सॉरेलच्या मृत्यूनंतर अशी अफवा उठली की त्यानेच सॉरेलला विष देऊन मारले. कूरला अटक झाली. त्याच्यावर आरोप ठेवण्यात आले व शेवटी तुरुंगात पाठविण्यात आले. पण ॲलिसनला फक्त त्याच्या अटकेची माहिती होती. तिच्या टेपवरील स्मृतिप्रमाणे राजाचे सैनिक जेव्हा कूरला अटक करण्यास आले तेव्हा कूरने ॲलिसनला विषाचा पेला दिला. तिने तो घेतला व आपले जीवन संपविले.

बी.बी.सी. टेलीव्हिजन प्रेक्षकांनी संमोहित अवस्थेतील इव्हॅन्सच्या या आश्चर्यकारक पूर्वस्मृति जेव्हा ऐकल्या तेव्हा ते प्रभावित झाले. इव्हॅन्स यावेळी नाटकी वाटत नव्हती. भीती व वेदनामुळे तिच्या आवाजातील फरक या भावना खऱ्या असल्याची साक्ष देत होत्या. लोकांची व स्थळांची कठीण नांवे ती सहजपणे उच्चारीत होती. त्यामुळे या लोकांशी व स्थळाशी ती परिचित असल्याची खात्री वाटत होती. पण जेव्हा ती संमोहनातून बाहेर आली व तिला याबाबत प्रश्न विचारण्यात आले तेव्हां यापैकी काहीही माहित नसल्याचे तिने सांगितले. आयव्हर्सनचा निष्कर्ष असा -

ब्लॉक्सहॅम टेपस्च्या पुराव्यावरुन असे ठामपणे म्हणता येईल की या टेपस्वरील पूर्वस्मृति म्हणजे केवळ कल्पनाविलास असे समजून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सध्याच्या माहितीच्या आधारे या टेपस् म्हणजे पुनर्जन्माचे दर्शन होय.

ब्लॉक्सहॅम टेपस्चे वस्तुनिष्ठ संशोधन झाले नाही. टेपवरील स्मृति-वर्णने केवळ कल्पनाविलास नसेल कशावरून ? कल्पनाविलास असेल तर त्याला मानसशास्त्रीय कारण असू शकेल. हीच गोष्ट आयव्हर्सनच्या लक्षात आली नाही. मेल्वीन हॅरीस या लेखकाने जेव्हा ब्लॉक्सहॅम प्रकरणाचा वस्तुनिष्ठ शोध घेतला तेव्हा या स्मृति याच जन्मातील काही कारणाने पुसल्या गेलेल्या (नेणीवेत लुप्त झालेल्या) पण संमोहनाने जागृत झालेल्या स्मृति असल्याचे त्याच्या लक्षात आले. या मनोविकाराला क्रिप्टोम्नेशिया असे नाव आहे.



माणसाचे मन ही सुप्त माहितीची प्रचंड गुहा आहे. विविध माध्यमांद्वारे ग्रहण केलेली माहिती अंतर्मनात साठून रहाते. सर्वसामान्यपणे पडद्याआड गेलेली ही माहिती पुसट होते. पण कधी कधी ही सुप्त स्मृती अचानक व्यक्त व्हायला लागते. ही अभिव्यक्ति त्या व्यक्तिला अगर ऐकणाऱ्याला बुचकळ्यात टाकते; कारण या स्मृतिचा उगम ती व्यक्ति विसरलेली असते. यालाच (Cryptomnesia) क्रिप्टोम्नेशिया असे नांव आहे.

अंतर्मनातील भावना, स्मृति यांचा उगम विसरल्यामुळे ह्या स्मृति - भावनांचे कारण लक्षात येत नाही आणि मग गैरसमज पसरायला सुरवात होते. प्रख्यात लेखिका हेलेन केलर या क्रिप्टोम्नेशियामुळे फसल्या आहेत. १८९५ मध्ये केलर यानी "The Forest King" नावाची सुंदर कथा लिहिली. त्या कथेचे रसिकांनी भव्य स्वागत केले. पण काही महिन्यातच मार्गारेट कॅनवीच्या कथेशी केलरची ही कथा जुळत असल्याची टीका झाली. कॅनवीची कथा १९२९ साली प्रसिद्ध झाली होती. केलरप्रमाणे इतर अनेक लेखकांची अशीच फसगत झाल्याचे दाखले आहेत.

१९५६ मध्ये डॉ. झोलीक या मारक्वेट विद्यापीठातील मानसशास्त्रज्ञाने क्रिप्टोम्नेशिया सप्रयोग सिद्ध केला. त्याने संमोहित व्यक्तिंना पूर्वजन्म आठवायला सांगितला. त्यांनी डॉ. झोलीकला पूर्वजन्मातील आठवणी सांगितल्या.जागृत अवस्थेत आल्यावर मात्र त्यांना त्यांच्या पूर्वजन्मांबद्दल विचारले असता त्यांना काहीच माहित नसल्याचे अगर आठवत नसल्याचे आढळून आले. पण जेव्हा या व्यक्तिंना पुन्हा एकदा संमोहनात नेऊन तेच प्रश्न पुन्हा विचारले असता पूर्वजन्मीच्या म्हणून सांगितलेल्या हकिगती आपणास कुठून मिळाल्या, त्यांचे उगम कोणते याची माहिती त्या व्यक्तिंनी दिली. सारांश तथाकथित पूर्वजन्माच्या हकिगती, याच जन्मातील पूर्वी अनुभवलेल्या व गडद भावनांचे रंग मिसळलेल्या स्मृति आहेत.

हिप्नॉटिक रिग्रेशनद्वारा पूर्वजन्म सिद्ध करू पहाणाऱ्या संशोधकाना डॉ. झोलीकनी आपली पद्धत वापरण्याचे आवाहन केले. संशोधकानी त्याकडे कानाडोळा केला. ब्लॉक्सहॅमने ४०० टेपचा डोंगर जमा केला पण या स्मृति क्रिप्टोम्नेशियातून आल्या असण्याची शक्यता त्याने गृहीत धरून चिकित्सा करणे गरजेचे होते. उलट फिनलंडमधील मानसशास्त्रज्ञ डॉ. कॅम्पमन यानी अशा घटनांचा झोलीक पद्धतीने अभ्यास केला.

माध्यमिक शाळेतील वरच्या वर्गातील एका मुलीला डॉ. कॅम्पमननी संमोहित केले. रिग्रेशन तंत्राने मुलीला मागे नेऊन पूर्वस्मृति आठवायला सांगितल्या

असता त्या मुलीने ८ पूर्वजन्मांच्या स्मृति संमोहन अवस्थेत सांगितल्या. १३ व्या शतकातील एका खाणावळवाल्याची मुलगी असताना त्यावेळच्या तिने सांगितलेल्या हकिगती मजेशीर होत्या. त्यावेळच्या जन्मात गायिलेले (Summer Song) हे गीत गाऊन दाखवून तिने सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला कारण चालू जन्मात हे गाणे तिने ऐकलेले वा वाचलेले नव्हते. तसे तिने संमोहन अवस्थेत सांगितले. पण मुलीला पुन्हा संमोहित करून याच जन्मात मागे यायला सांगून वरील गीत तू केव्हा वाचलेस वा ऐकलेस असा प्रश्न तिला विचारला. तेव्हा १३ व्या वर्षापर्यंत मागे गेल्यावर एका वाचनालयातील शेल्फवरून हे गीत असलेले पुस्तक आपण घेतले व वाचले असे तिने सांगितले. एवढेच नव्हे तर हे गीत कितव्या पानावर आहे हेही तिला स्मरले. हे पुस्तक वाचनालयात जाऊन कॅम्पमननी शोधले. ते मिळाले. कविताही मिळाली. नेमक्या त्याच पानावर.

मोल्विन हॅरीस हे बी. बी. सी. शी संबंधीत लेखक व निर्माते. त्यांनी ब्लॉक्सहॅम टेप प्रकरणाचा पाठपुरावा केला. Free Enquiry या मासिकात त्यांनी लिहिलेल्या लेखाचा संक्षेप खाली दिला आहे. त्यावरून ब्लॉक्सहॅम प्रकरणावर प्रकाश पडेल.

ब्लॉक्सहॅम टेपस्चे झोलीक पद्धतीने संशोधन करण्याचा मी प्रयत्न केला. यासाठी ज्यांच्या पूर्वस्मृति टेपवर रेकॉर्ड केल्या होत्या त्या व्यक्ति संमोहनासाठी पुन्हा तयार होणे आवश्यक होते. पण इव्हॅन्सने आपल्या तपासणीला साफ नकार दिला. मग मी टेपच्या आधारेच टेपवरील माहितीचा उगम शोधणे हा एकच उपाय करून बघण्याचे ठरविले. आयव्हर्सनने 'इव्हॅन्सची केस पुनर्जन्माचा खात्रीशीर पुरावा' अशी जाहिरातबाजी केली होती. म्हणून या केसची तपासणी होणे अत्यावश्यक व महत्वाचे होते.

माझ्या संशोधनातून ब्लॉक्सहॅम टेपस् हा पुनर्जन्माचा खात्रीशीर पुरावा आहे हा दावा फोल असल्याचे व ब्लॉक्सहॅम टेपस्चे संशोधन चुकीच्या दिशेने व अपुरे असल्याचे सिद्ध झाले.

१) इव्हॅन्स ही एका पूर्वजन्मात कॅथेरिन ऑफ अरेगॉनची दासी होती. या पूर्वजन्मातील तिच्या आठवणी जेन प्लेडीच्या 'Catherine, The Virgin Widow' या ऐतिहासिक कांदबरीतील घटनांशी तंतोतंत जुळतात हे मला आढळले. ही केस क्रिप्टोम्नेशियाची आहे हे सांगण्याची गरज नाही.

(२) जेक्स कूर या १५ व्या शतकातील फ्रेंच व्यापाऱ्याची ॲलिसन ही दासी. हा



इव्हॅन्सचा आणखी एक पुनर्जन्म. टेपवरील वर्णनावरून असे वाटायला लागते की १५ व्या शतकातील फ्रान्सचा इतिहास इव्हॅन्स अचूकपणे कसा काय सांगू शकते ? पूर्वस्मृतिशिवाय हे शक्य नाही. जागृत अवस्थेत तर तिला यातले काहीच आठवत नाही. आयव्हर्सनचा निष्कर्ष असा - राजमाता सॉरेल भोवती जी अनेक रहस्यांची व कारस्थानांची वलये होती ती इव्हॅन्सने तपशीलवार सांगितली. कूरच्या भव्य घराचे आतील व बाहेरील भागाचे खडा न खडा तपशीलवार वर्णन ती देत होती. मुख्य हॉलमधील शेकोटीच्या जागेवरील छताचे नक्षीकामाचे वर्णन तिने अचूक सांगितले. सॉरेलच्या चर्चमधील थडग्याची पण तिने माहिती दिली. हे आश्चर्य नव्हे काय ? आयव्हर्सनच्या म्हणण्याप्रमाणे हे थडगे फ्रान्सच्या राज्यक्रांतीत उखडून फेकून देण्यात आले होते. १६५ वर्षांनी ते चर्चमधील तळघरात सापडले. (प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळीच आहे. आयव्हर्सनचे हे विधान खोटे असल्याचे माझ्या लक्षात आले)

वस्तुस्थिती काय आहे ? सॉरेलचे थडगे आज आहे त्याच स्थितीत १८०९ साली बांधले आहे. गेली १०० वर्षे ते प्रवाशांच्या भेटीचे आकर्षण ठरले आहे. सेजविकच्या 'A Short History of France' या १९३० साली लिहिलेल्या ग्रंथात त्याचे वर्णन आहे. हे पुस्तक लोकप्रिय होते. ते सार्वजनिक ग्रंथालये व शाळांतून ठेवलेले असे. याशिवाय इतर अनेक पुस्तकात या थडग्यांचे व इतर फोटोही आहेत.

कूरच्या घराबद्दल काय वस्तुस्थिती आहे ? फ्रान्समधील सर्वात जास्त फोटोग्राफ घेतलेले ते घर आहे 'Dame Evance' च्या 'Life in Medieval France' या पुस्तकात या घराचे सुंदर व स्पष्ट फोटो आहेत. या फोटोत घरातील फायरप्लेसच्या वरील नक्षीकाम स्पष्ट दिसते. इव्हॅन्सने हे फोटो पाहिले असले पाहिजेत याबद्दल शंका वाटत नाही.

इव्हॅन्सच्या टेपवरील आठवणींचा उगम कोणता असावा ? 'The Money Man' ही १९८४ मधील कॉस्टनची कादंबरी. ही कादंबरी कूरच्या जीवनावर आधारीत आहे. या पुस्तकातील वर्णने टेपवरील वर्णनाशी जुळतात.

या कादंबरीतूनच आयव्हर्सनने उपस्थित केलेल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तरही मिळून जाते.

प्रश्न असा - कूरचा विवाह झाला होता. मग त्याच्या कुटुंबाची माहिती इव्हॅन्स (ॲलिसन) का सांगू शकली नाही ? कूरच्या विवाहाची व त्याच्या कुटुंबियांची माहिती इतिहासाच्या अनेक पुस्तकात आहे. इव्हॅन्सने जर इतिहासाची

पुस्तके वाचली असतील तर कूरच्या विवाहाबद्दल तिला कशी माहिती नाही ? याचा अर्थ असा की कूरबद्दल वाचलेले ती आठवून सांगत होती हे अशक्य वाटते. म्हणजेच पुनर्जन्म सिद्ध होतो.

कॉस्टनने कूरवरच्या कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहिले आहे - 'कूरच्या कुटुंबियांचा कादंबरीत मी कुठेच उल्लेख केला नाही. कारण त्याच्या जीवनातील महत्वाच्या घटनेशी त्यांचा फारसा संबंधच येत नाही. म्हणून ही मंडळी मी कादंबरीतून वगळली. .

ऐतिहासिक कादंबरीचे वाचन व कल्पनाविलास यातून इव्हॅन्स क्रिप्टोम्नेशियाची शिकार ठरली हाच निष्कर्ष अटळ आहे.

(३) लिव्होनिया केस -

१९४७ मध्ये लुईस डी वूल याने "The Living Wood" ही प्रचंड खपाची कादंबरी लिहिली. या कादंबरीचा प्रभाव लिव्होनिया केसमध्ये आढळतो. या कादंबरीतील प्रसंग जसेच्या तसे इव्हॅन्सने, लिव्होनिया म्हणून केलेल्या पूर्वजन्माच्या वर्णनात व हकिगतीत येतात. त्यांचा क्रम देखील कादंबरीतील क्रमाबरोबर आहे. कादंबरीत काही पात्रे ऐतिहासिक आहेत व काही काल्पनिक आहेत. ही काल्पनिक पात्रे देखील इव्हॅन्सच्या वर्णनात आली आहेत.

कादंबरीतील काही पात्रांमध्ये मात्र बदल केला गेलाय. दुःखी कष्टी, अतृप्त हेलन, इव्हॅन्सच्या हकिगतीत स्वतः लिव्होनिया बनते. सुंदर, निरागस चेहऱ्याचा व स्वप्नाळू डोळ्यांचा हिलरी हा टिटस बनतो. हिलरी हा कादंबरीतील हिरो. स्त्रियांना हवाहवासा वाटणारा पुरुष. साहजिकच इव्हॅन्स त्याला आपला पूर्वजन्मीचा प्रियकर बनविते. यातून ती स्वप्नाळू बनते. तिची दिवास्वप्ने व भावतरंग यांचा उगम वूडच्या कादंबरीच्या वाचनात दिसतो.

अशा तऱ्हेने पुनर्जन्माची सत्यता सिद्ध करणाऱ्या विश्वसनीय म्हणून गणल्या गेलेल्या, कित्येक वर्षापर्यन्त ज्यांच्या खरेपणाबद्दल कुणालाही आव्हान देता येणार नाही अशा बी.बी.सी.ने प्रक्षेपित केलेल्या घटना पुनर्जन्माच्या नसून केवळ कल्पनाविलास असल्याचे सिद्ध आले.

**B. Premanand**

आधार - Indian Skeptic

☆☆☆



# ७. प्लँचेटचे गौडबंगाल

## प्लँचेट केले - मन गरोदर झाले

श्रीयुत अ हे निवृत्त सरकारी अधिकारी. १९६२ मध्ये वयाच्या साठाव्या वर्षी ते एका महत्वाच्या खात्याच्या असिस्टंट कमिशनर पदापर्यन्त पोहोचून निवृत्त झाले. श्रीलंकेतील राजकीय व सामाजिक प्रतिष्ठा लाभलेल्या प्रसिद्ध व सुखवस्तु कुटुंबापैकी ते एक होते.

२६ नोव्हेंबर १९६७ रोजी श्रीयुत 'अ' आपल्या तरुण पत्नी समवेत मला भेटायला आले. सौ. अ ला बैठकीच्या खोलीत बसायला सांगून मी श्रीयुत अ ना वरच्या मजल्यावरील माझा अभ्यासिकेत घेऊन गेलो. त्यांना आपली कर्मकहाणी मला सांगायची होती.

"जेरिन ही माझी दुसरी पत्नी. तिचे माहेरगाव मातारा. एक लहान मूल मागे ठेवून माझी पहिली पत्नी वारली. ते मूल पण नंतर वारले. मी निवृत्त झाल्यावर जेरिनशी दुसरा विवाह केला. तिच्यापासून मला दोन अपत्ये झाली. त्यातील एक मुलगी साडेतीन वर्षाची व दुसरा मुलगा ११ महिन्याचा आहे."

दोन महिन्यापूर्वीची गोष्ट. त्या दिवशी पाऊस पडत होता. कुठे बाहेर जावे, काय करावे हे सुचेना. मग आम्ही प्लँचेटची गंमत करावयाचे ठरविले. मागे एकदा असाच प्रयोग आम्ही केला होता. डायनिंग टेबलवर खडूने ए पासून झेड पर्यन्तची अक्षरे आम्ही वर्तुळावर काढली . पेला वर्तुळाच्या मध्यावर ठेवला. जेरीन व मी दोघांनी पेल्यावर आपली तर्जनी ठेवून आत्म्याला आवाहन केले.

## आत्म्याचे आगमन -

काही मिनिटाच्या उत्कंठा वाढविणाऱ्या अवधीनंतर पेला आपोआप हळू हळू हलायला लागला. वेळ जसजसा जाईल तसतसा पेला वेग घेऊ लागला व अक्षरांना स्पर्श करू लागला. ही अक्षरे क्रमाने आम्ही एका कागदावर लिहून घेतली व त्यामधून आत्म्याचा संदेश आम्हाला मिळू लागला.

प्लँचेटवर पहिल्यांदा ज्याने पेला हलविला तो आत्मा स्वर्गवासी बंदरनायके, माजी पंतप्रधान यांचा होता. बंदरनायके हे आमचे स्नेही होते. त्यांच्या आत्म्याला आम्ही बरेच प्रश्न विचारले. त्यांची आम्हाला बरोबर उत्तरे मिळाली.

प्लँचेटवर आलेला दुसरा आत्मा हा थॉमस सिल्व्हाचा होता. त्याचा आमचा पूर्वपरिचय नव्हता. त्याला आम्ही फार प्रश्न विचारले नाहीत. तिसरा आत्मा होता बूनवंत बाईचा. 'माझ्या नवऱ्याने मला गोळी घालून ठार केले,' असे तिने आम्हांस सांगितले.

प्लँचेटवर जो चौथा आत्मा आला तो होता एल्.एच्.मेथनंदाचा . त्याच्या मृत्यूपूर्वी मी आणि मेथनंद एका धार्मिक संघटनेचे सभासद म्हणून एकत्र काम करीत होतो. त्याच्या आत्म्याने मला उपयोगी पडेल अशी बरीच माहिती दिली. प्लँचेटवर आलेला पुढचा आत्मा टी.यु.डिसील्व्हाचा होता. तो आणि मी जिवलग मित्र होतो आणि एकाच राजकीय पक्षाचे सदस्य होतो. सहावा आत्मा आमच्या कुटुंबाचे स्नेही सी.टी.जयसुंदरा यांचा. त्याने जेरीनला माझ्या प्रकृतीकडे खास लक्ष देण्याचा संदेश दिला.

लंच आणि थोडासा आराम केल्यावर आम्ही प्लँचेट पुन्हा खेळू लागलो. यावेळी प्रथम विष्णूचा आत्मा आला. जेव्हा आम्ही त्याला ठराविक प्रश्न विचारले. तेव्हा तुम्ही माझ्याबद्दल शंका का घेता असे उलट प्रश्न त्याने विचारले.

## संत ज्यूडचे आगमन –

सर्वात शेवटी जो आत्मा प्लँचेटवर आला तो होता संत ज्यूडचा. त्याने त्याच्यामार्फत भेट म्हणून जेरीनला सोन्याची अंगठी भेट देण्याविषयी मला आज्ञा केली. त्याने असेही सांगितले की सेंट ॲनी चर्चमधील त्याच्या स्वत:च्या पुतळ्याच्या पायाजवळ एक सोन्याची अंगठी तो जेरीनसाठी ठेवणार आहे. तिने चर्चमध्ये जावे, पुतळ्यावर मेणबत्या पेटवाव्या व ती अंगठी स्वीकारावी असा त्याचा आग्रह होता.

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघेजण सेंट ॲनी चर्चला भेट दिली, ज्यूडच्या पुतळ्यासमोर मेणबत्त्या पेटविल्या पण आम्हाला पुतळ्याजवळ अंगठी मिळाली नाही. यामुळे जेरीनची घोर निराशा झाली. परतीच्या वाटेवर असताना, आता यापुढे अशा आत्म्यांना प्लँचेटमधून आपले घरी बोलविण्याचा प्रकार आपण करणे बरे नाही असे मी तिला सांगितले.

पण मला माहित न होता जेरीनने त्या रात्री एकटीने प्लँचेटचा प्रयोग केलाच.



तिच्या सांगण्यानुसार ज्यूड पुन्हा आला आणि पुतळ्याच्या पायाजवळ अंगठी न ठेवल्याबद्दल त्याने दिलगिरी व्यक्त केली. त्याने असे केले कारण त्यावेळी मी जेरीनसोबत होतो. तिने दुसऱ्या दिवशी एकटीनेच चर्चमध्ये यावे अशी त्याने जेरीनला विनंती केली.

दुसऱ्या दिवशी ती आपल्या आजारी भावाला सोबत घेऊन चर्चमध्ये आली. तिने पुतळ्यासमोर मेणबत्या लावल्या व प्रार्थना केली पण अंगठी काही तेथे मिळाली नाही. बराच वेळ ती पुतळ्याच्या पायाशी बसून राहिली आणि डोळ्यात पाणी आणून प्रार्थना केली पण शेवटी पदरी निराशाच पडली. तिने अंगठीशिवाय चर्च सोडण्यास भावाला नकार दिला. शेवटी भावाने व गाडीच्या ड्रायव्हरने ओढीत आणूनच तिला गाडीत कोंबले.

## वेड लागले –

तेव्हापासून ती वेड्यासारखी वागू लागली व नेहमी ज्यूडबद्दल बडबड करू लागली. गेले तीन आठवडे ती सारखी रडते आहे व गरोदर असल्याचे सांगत आहे. ती तिला नववा महिना लागला आहे असे जरी सांगत असली तरी गरोदरपणाचे कोणते चिन्ह तिच्या शरिरावर दिसत नाही. दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर आम्ही लैंगिक संबंध बंद केले आहेत. मी ध्यानधारणेत वेळ घालवितो आणि शरिर संबंध टाळतो.

गेल्या दोन महिन्यात मी विविध ठिकाणच्या चर्चेस, मांत्रिकांकडे, महाराजांकडे तिच्यावर उपचार केले. काहींनी तिला माझ्या पहिल्या बायकोचे भूत लागल्याचे तर काहींनी वेगळी भूते लागल्याचे सांगून दक्षिणा वसूल केली. एका बाईने जेरीनला विषप्रयोग झाल्याचे सांगितले. उलटीचे औषधही दिले. शेवटी शेवटी जेरीनच्या अंगात येऊन ती नाचू पण लागली. एका मांत्रिकासमोर अंगात येऊन तिने सांगितले की तिला माझ्या पहिल्या बायकोच्या भूताने झपाटले आहे. मांत्रिकाने तिच्या अंगावरून कोंबडा ओवाळून ते भूत काढले पण तिची अवस्था अधिकच बिघडली. आता तर ती आपण गरोदर आहोत असे सारखी बडबडते.

## वस्तुस्थिती काय होती ?

मी श्रीयुत अ ना खाली जाण्याची व जेरीनला वर पाठविण्याची सूचना केली. माझी पत्नी तिला वर घेऊन आली आणि कोचावर तिला आरामात बसायला लावले. वर येताना ती तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत होती.

जेरीनचे वय जरी ४४ वर्षे असले तरी ती तरूण व सुंदर वाटत होती. तिला मी संमोहनाद्वारे लाईट ट्रान्समध्ये नेले व बोलते केले. ती सांगू लागली.

"माझे माहेर मातारा. मी कॉन्व्हेंटमध्ये शिकले. माझ्या इतर वर्ग मैत्रिणींबरोबर मी शाळेत रोजच्या प्रार्थनेत भाग घेई. मी व श्रीयुत 'अ' दोघेही बौध्द धर्मीय आहोत.

माझ्या पतीचे माझ्याबरोबरचे लग्न दुसरे असले तरी माझे हे पहिलेच लग्न. आम्ही दोघेही एकमेकांशी निष्ठा ठेवून आहोत. दुसऱ्या अपत्यानंतर मूल नको असे आम्ही दोघांनी ठरविले कारण त्याचे काही भलते झाले तर तिसऱ्या मुलाला वाढविणे व त्याचे शिक्षण करणे मला अवघड गेले असते. माझे पती वेगळ्या खोलीत झोपतात. मी मुलांबरोबर देवघराच्या खोलीत झोपते.

देवघरातल्या खोलीत बुध्दाची मूर्ती आहे. त्याच्या एका बाजूला विष्णूची व दुसऱ्या बाजूला देवीची मूर्ती आहे. या मूर्तींसमोर रात्रंदिवस समई तेवत असते. आम्ही रोज मूर्तींना फुले वाहतो.

आमची आर्थिक स्थिती उत्तम आहे. माझे पती पवित्र व धार्मिक वृत्तीचे आहेत. आम्ही इतर धर्माचा आदर करतो.

जेव्हा मी एकटीनेच प्लँचेटवर ज्यूडला बोलविले त्यावेळी त्याने मला खूप गोष्टी सांगितल्या व याबद्दल पतीला काहीही न सांगण्यास बजावले. त्याने मला सांगितले की त्याचे माझ्यावर प्रेम आहे व मी त्याची मागच्या जन्मातील पत्नी आहे. मागच्या जन्मातील माझे नांव होते रोझ व त्याचे नाव होते रॉली दि रिमस. पुढच्या जन्मात देखील त्याला माझा पती व्हायचे आहे असे त्याने मला सांगितले.

प्लँचेट संपल्यावर रोज रात्री ज्यूड माझेकडे येई व माझ्या शेजारी झोपे. एखादेवेळी पती बाहेर गेलेले असले की तो स्वयंपाक घरात येई आणि बाथरुमकडे मला ओढून नेई. तेथे मला आलिंगन देई आणि माझ्याबरोबर प्रेमाचे चाळे करी. एखादे वेळी तो मला विवस्त्र करतो व माझ्या अंगावर क्रॉसची खूण काढतो. मधूनच तो मला फार वेदना न होईल अशा पद्धतीने हलकासा चावाही घेतो."

या क्षणी तिने अजिबात संकोच न करता आपल्या पोलक्याची बटने काढली व छातीवर नखाने कोरलेला क्रॉस व उजव्या हातावर चावल्याच्या खुणा दाखविल्या.

ती पुढे सांगू लागली,

"तो प्रेमळ असल्याने मला फार आवडतो. तो अत्यंत सुंदर आहे. पुतळ्यात तो जसा दिसतो त्यापेक्षा तो फारच वेगळा आहे. तो गुळगुळीत दाढी करतो."

एके दिवशी त्याने मला धमकी दिली की ह्या गोष्टी बाबत मी पतीशी काही



बोलले तर तो माझी मान पिरगाळेल. एका प्रसंगी त्याने माझ्या बोटातील विवाह भेटीचे वेळी पतीने दिलेली अंगठी व कानातील झुबे काढून घेतले. तीन प्रसंगी त्याने माझ्या उशीखाली रु. १,०००, रु. १६,००० व रु. ८०० ठेवले होते."

हे सांगून झाल्यावर ती जोरात रडू लागली. तू का रडतेस असे मी विचारल्यावर तिने सांगितले - "मी गरोदर आहे. मला नववा महिना लागलाय. पुढच्या महिन्यात जेव्हा मी प्रसूत होईन तेव्हा लोकांना कळून येईल की हे मूल माझ्या पतीपासूनचे नव्हे. अशा बेवारशी मुलाला जन्म देण्यापेक्षा मरण बरे."

त्यावेळी मी तिला संमोहनातून जागे केले. तिला पत्नीबरोबर खाली जाण्यास सांगून, श्रीयुत 'अ' ना पुन्हा वर येण्यास सांगितले.

## भ्रमाचे कारण -

जेव्हा श्रीयुत 'अ' कोचावर बसले तेव्हा मी त्यांच्या हातात सिलोन ऑब्झर्व्हरची रविवार पुरवणी दिली. त्यामध्ये लता नामक एका शालेय मुलीची अशाच प्रकारची मी तपासलेली केस वर्णन केली होती. आपल्या मृत प्रियकराबद्दल तिला असेच भास होत असत. तो प्रियकर तिला रात्री भेटायला येई व तिच्याशी प्रेमचाळे करी.

जेव्हा श्रीयुत 'अ' ने लताची केस वाचून पूर्ण केली तेव्हा मी त्यांना म्हणालो की तुमच्या पत्नीची केस या लताच्या केससारखीच आहे आणि या प्रकाराला तुम्ही स्वतः जबाबदार आहात. हे ऐकताच आपल्यावरील आरोपामुळे श्रीयुत 'अ' ना धक्काच बसला.

मी पुढे म्हणालो, "तुमची दोघांचीही मने वेडपट व अंधःश्रद्ध कल्पनांनी भारलेली आहेत. आत्मे असतात व त्यांना प्लँचेटवर बोलविता येते असे मानणे हा शुद्ध वेडेपणा आहे."

प्लँचेटच्या प्रकारामुळे जेरीनचे मन भ्रमिष्ट झाले. अतिशय संवेदनशील मनाची अशी जेरीन, तुमच्या प्रमाणेच भूते, मंत्रतंत्र, पूजा-अर्चा इ. अंधविश्वासाने संस्कारीत झालेली आहे आणि अशा समजुतीची शिकार बनली आहे."

"जेव्हा तुम्ही दोघेजण पेल्यावर बोटे ठेवत होता तेव्हा जेरीनच्या सुप्त मनाच्या प्रभावाने तिचेच बोट नकळत पेल्याला हलवीत होते. याचमुळे तिने जेव्हा एकट्याने प्लँचेट केले तेव्हा देखील पेला हलू लागला."

"विविध आत्म्यांचे तुम्ही केलेल्या प्लँचेटवर येणे व तुमच्याशी बोलणे हे खरे नाही. जेरीनच्या बाह्यमनाच्या हे लक्षात आले नाही की तिच्या सुप्त

मनोव्यापारामुळे पेला हलला. तिला आत्म्याकडून मिळालेली उत्तरे ही तिच्या सुप्त आशा-आकांक्षाची प्रतिबिंबे होती. या विचित्र अनुभवातून तिच्या दुबळ्या मनावर परिणाम झाला. तिच्या भूताखेतांच्या, दुष्टात्म्यांच्या पूर्वग्रहदूषित भीतीमधून प्लँचेटच्या घटनेने तिला मानसिक धक्का बसला व ती मनोरुग्ण बनली.''

''तिचे जूडबरोबरचे प्रेमचाळ्याचे भास हे तिच्यासारख्या तरुण स्त्रीच्या अतृप्त लैंगिक भुकेचे काल्पनिक समाधान करण्याच्या मनाच्या गरजेतून निर्माण झाले. खरोखरचा (वास्तव) ज्यूड हा तिला भेटत नव्हता तर ज्यूडचे तिला भेटणे, तिला आलींगन देणे, त्याच्यापासून तिला दिवस जाणे हे तिच्याच मनाचे केवळ काल्पनिक खेळ (Hallucinations) आहेत.'' ''तुमच्यासारख्या सुशिक्षीत गृहस्थाने मनोविकार तज्ञांचा सल्ला घेण्याऐवजी, मांत्रिकांकडे जाऊन आपला पैसा बरबाद करावा याची मला कीव येते.''

## जेरीनवरचे उपाय –

''जेरीनचा सर्व त्रास मानसिक आहे.त्याचा दुष्ट वा कसल्याही आत्म्यांशी संबंध नाही. तुम्ही जर मला सहकार्य केलेत तर मी हा विकार घालवू शकतो. तुम्ही आजपासून ध्यानधारणा करणे थांबवा आणि जबाबदार नवऱ्याप्रमाणे वागा. ऐन तारुण्यात तुमच्या पत्नीची शारीरिक भूक न भागविता, ध्यानधारणा करणे म्हणजे खुळेपणा आहे. तुमची पत्नी तुमच्याच वयाची असती तर हा त्रास उपस्थितच झाला नसता.''

'तुम्हाला तिसरे अपत्य नको असेल तर वैद्यकीय सल्ल्याने ते टाळता येईल. जेरीन धार्मिक वातावरणात वाढल्याने आपली लैंगिक भूक अनैतिक मार्गाने भागविण्यास ती धजावली नाही. मग कल्पनेतल्या ज्यूड बरोबर प्रेमसंबंध जोडण्याचा सुप्त मनांचा आविष्कार अशा भासांमधून व्यक्त होऊ लागला.''

श्रीयुत 'अ' नी माझा सल्ला मानला. ते खाली गेले. त्यांच्या पत्नीला (जेरीनला) मी पुन्हा वर बोलावून घेतले. मी तिला खोल संमोहनात नेले आणि सांगितले.

''ज्यूड तुझ्यासमोर उभा आहे. ही त्याची तुला शेवटचीच भेट आहे. तो निरोप घ्यायला आलाय.'' तिला मी पुढे सूचित केले, ''तुझ्या कुशीतील बाळ ज्यूड घेऊन जात आहे. तो यापुढे तुला कधीही भेटणार नाही. त्याऐवजी तुझा पती नियमितपणे तुझी सोबत करील. तो तुझ्यावर नितांत प्रेम करेल व तू त्याच्याबरोबर रमून जाशील.''



संमोहनातून तिला जागे केल्यावर काही मिनीटांनी श्रीयुत 'अ' व जेरीनने हसतमुखाने माझे घर सोडले. एक महिन्यानंतर दोघेही मला भेटायला व माझे आभार मानायला आले. येताना त्यांनी भेटवस्तू प्रेमपूर्वक मला देण्यासाठी आणल्या होत्या. त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांची ही कहाणी फ्रान्स, स्पेन व इटाली या पाश्चिमात्य देशात प्रसिद्ध करण्याची मी परवानगी मागितली.

'याच देशात कशासाठी ?' जेरीनचा प्रश्न. ''तू जर यापैकी कोणत्याही देशात असतीस तर तुला तेथील लोकांनी पूज्य माताजी म्हणून डोक्यावर घेतले असते. पूज्य माताजी जी पवित्र आत्म्यामुळे माता बनली'' मी म्हणालो.

वरील सत्य घटना डॉ. कोवूरांच्या पुस्तकातून अनुवादीत केली आहे.

प्लँचेटमध्ये आत्मा येण्यासाठी बोटांची गरज काय ? बोटे प्रेरणा लावतात. हे कधी मुद्दाम वा अजाणतेपणी घडविले जाते. त्यामुळेच पेला हलू लागतो. बोटे उलटी ठेवावयास सांगितली तर पेल्यास बल लावता येत नाही. पेला हलत नाही. बोटे न लावता पेला हलत नाही. आत्मा पेला हलवत असेल तर माध्यमाची (बोटांची) गरज नाही.

काही प्रश्नांची उत्तरे खरी कशी येतात ? जेरीन व मि. 'अ' यांच्या काही प्रश्नांची उत्तरे मिळाली. हा त्यांच्या सुप्त मनाचा खेळ आहे. त्यांना जी उत्तरे हवी होती त्याप्रमाणे नकळत बोटे पेला फिरवू लागली व उत्तरे मिळाली. हा भ्रमाचा खेळ आहे.

आत्मा अचूक उत्तरे देत असेल तर आम्ही चाचणी घेण्यास तयार आहोत. प्लँचेट करणारे एका खोलीत बसतील. शेजारच्या खोलीच अंधःश्रद्धा निर्मूलन समिती काही वस्तू लपवून ठेवील. त्या प्लँचेटवरील आत्म्याने ओळखाव्या. हे आव्हान कोणीही स्वीकारीत नाही.

वस्तुनिष्ठ आत्मा नाही. म्हणून भूत नाही, चेटूक नाही, पितर नाही, चकवा नाही, अंगात येणारा देव नाही. आत्मा हवेत संचार करीत नाही, प्लँचेटवर येत नाही. सत्यरुपाने आत्मा कोठेही नाही.

☆☆☆

# परिशिष्ट – अ

गेल्या अनेक वर्षात प्रजननशास्त्र (Genetics) व भौतिक विज्ञान (Physics) यामध्ये झालेल्या संशोधनातून देहभिन्न आत्म्याची कल्पना असत्य असल्याचे सिध्द होते. आता विज्ञान व अध्यात्म या दोन डगरीवर हात ठेवून समन्वय साधण्याची गरज नाही. याबाबतीत भाबडेपणा टाकून परखड लिहिणे आवश्यक आहे.

देहाव्यतिरिक्त आत्मा असतो या गृहीतास पुरावा म्हणून बाल, तरुण आणि म्हातारपण या अवस्थ्यामध्ये देह बदलतो पण 'मी' तोच असतो. हा मी म्हणजेच आत्मा असा युक्तीवाद केला जातो. आधुनिक विज्ञानानुसार मी पणाच्या जाणिवेचे ठिकाण 'मेंदू' हे आहे. हृदय नव्हे. तीनही अवस्थामध्ये देहात बदल होत असला तरी मेंदूत काही काळ वाढ होते पण त्यात बदल होत नाही म्हणून मी मध्ये बदल जाणवत नाही.

आत्म्याच्या अस्तित्वास पुरावा म्हणून दोन परस्परावलंबी युक्तिवाद केले जातात. ईश्वर दयाळू असताना जगात एवढी विषमता व निर्घृणता कां ? याचे उत्तर विषमतेचा किंवा दुष्टतेचा बळी'पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ भोगतो असे दिले जाते. यासाठी आत्मा व पुनर्जन्म गृहीत धरला जातो. उलट आत्मा नसेल तर न केलेल्या कर्माचे फळ मिळणे व केलेल्या कर्माच्या फळांच्या नाश होणे हे दोष उत्पन्न होतात. म्हणजे आत्म्याकरता कर्मसिध्दांत आणि कर्मसिध्दांताकरता आत्मा असा हा युक्तिवाद आहे. विज्ञानाच्या दृष्टिने कर्मसिध्दांत आणि आत्मा दोन्हीही अनावश्यक आहेत. विश्वातील विषमता व निर्घृणता, संभाव्यता (Probability) सिध्दांताने स्पष्ट करता येतील. निर्गुण ईश्वराला दयाळूपणाचा गुण चिकटविण्याचे मुळीच कारण नाही. वादळात, भूकंपात, विमान अपघातात हजारो माणसे एकाचवेळी मृत्यूमुखी पडतात. त्या सर्वांचे पूर्वकर्म एकसारखे असावे असे समजणे तर्काला धरून होणार नाही. निसर्गात संभाव्यता सिध्दांताला धरून अनेक घटना घडत असतात. उदाहरणार्थ पाण्याचे बाष्पीभवन. बाष्पीभवन होताना पाण्याचे अनेक रेणू हवेत उडून जातात. कोणते रेणू बाष्परुप होणार हे त्यांचे पूर्वकर्म ठरवतात असे म्हणणे हास्यास्पद आहे.

पुढच्या पिढीत येणारे गुणदोष मातापित्याकडून आलेल्या गुणसूत्रांवर (Genes) अवलंबून असतात. काही गुणसूत्रे बदलली वा काढून टाकली तर त्यामुळे होणाऱ्या रोगाचे उच्चाटन होईल. हे प्रजनन तंत्रज्ञानाने शक्य होईल. त्या दिशेने प्रगती चालू आहे. मग असे रोग पूर्वकर्मामुळे होतात हे गृहीत निकालात निघेल.



एकेकाळी कुष्ठरोग पूर्वकर्मातील पापामुळे होतो असे समजले जाई. पण वैद्यकीय उपचारांनी कुष्ठरोग आता पूर्णपणे बरा होतो. बाबा आमटे यांनी अनेक महारोग्यांच्या पूर्वकर्माचा शाप (?) वैज्ञानिक उपचाराने उलटविला आहे. कर्मसिध्दांत व आत्मा ह्या कल्पना असत्य असल्याचे वरील प्रमाणातून सिध्द होते.

मृताचा आत्मा तेजातून मेघात, मेघातून पर्जन्यात, पर्जन्यातून अन्नात, अन्नातून रसात व रसातून वीर्यात प्रवेश करतो अशी धार्मिक तत्वज्ञानविषयक समजूत आहे. मनुष्याच्या वीर्यात एका घनसेंटीमीटरमध्ये (छोटा चमचभर) ६ ते १२ कोटी शुक्रबीजे (Sperm) असतात. परंतु त्यातील एकच नव्या जिवाच्या निर्मितीत वापरले जाते. कोट्यावधी शुक्रबीजांमधून त्या एकाच बीजात आत्मा नेमका बिनचूक प्रवेश करतो असे मानणे हास्यास्पद आहे.

प्रजनन तंत्रात झालेल्या प्रगतीमुळे पुनरुत्पादनासाठी वीर्याची गरजच नाही. वनस्पती वा प्राणी यांची कोणतीही पेशी निवडून, नवीन वनस्पती वा प्राणी तयार करता येतात. साग, वेलदोडा, बटाटे, केळी यांची व्यापारी तत्वावर जातीवंत रोपे तयार करण्यासाठी उतीसंवर्धन (Tissue culture) ह्या तंत्राचा उपयोग सुरु झाला आहे. प्राण्यांच्या पेशीपासून नवा प्राणी जन्माला घालण्याचे तंत्र म्हणजे 'क्लोनिंग'. या तंत्राने 'डॉली' नामक मेंढीला जन्म दिला गेला. या तंत्रात नराचा (वीर्याचा) सहभाग नसतो. मग वीर्यातून प्रवेश करणाऱ्या आत्म्याचे काय ? भविष्यात क्लोनिंगने माणसाची निर्मिती झाली तर त्यास आत्माच नाही असे समजायचे काय ?

हल्ली कृत्रिम गर्भधारणांच्या प्रयोगात संजीवकांचा (Harmones) उपयोग करून स्त्रियांमध्ये एकाचवेळी अनेक अंडपेशी उपलब्ध करता येतता. अशा तंत्राने एकापेक्षा जास्त मुले जन्माला येण्याच्या घटना घडतात. हेच तंत्र मासे व कोंबड्या यांचे प्रजोत्पादान वाढविण्यास वापरले जाते. प्रजोत्पादन ही पूर्णपणे नैसर्गिक व जैविक प्रक्रिया आहे, हे या प्रयोगातून लक्षात येते. या प्रजेत इतके असंख्य आत्मे बाहेरून शिरणे असंभव वाटते.

शुक्रपेशी द्रव नायट्रोजनमध्ये कित्येक वर्षे सुप्तावस्थेत जिवंत रहातात. अमेरिकेत तर मानवी शुक्रपेशींच्या बँका उघडल्या आहेत व कृत्रिम गर्भधारणेकरता हव्या त्या प्रकारच्या पेशी वापरल्या जात आहेत. अशा तऱ्हेने होणाऱ्या प्रजेत त्यांच्या आनुवंशिक विकारास पूर्वकर्माप्रमाणे भोगण्यास लायक असे आत्मे मिळतात, असे कसे म्हणता येईल ?

गर्भपेशी (Embryo) सुध्दा द्रव नायट्रोजनमध्ये सुप्तावस्थेत ठेवता येतात. मूळ गर्भपेशीचे विभाजन करून त्यातील एक वाढवून व इतर सुरक्षित ठेवून

वाढविलेल्या पेशीपासून तयार होणारी व्यक्ति मृत झाल्यास तिची अचूक प्रतिकृती राखीव पेशीपासून बनविता येईल. अशा रितीने एका व्यक्तिसारखीच दुसरी व्यक्ति पुन्हा निर्माण करता येईल. प्रतिकृती करताना दाईमाता कदाचित निराळ्या पिढीचीही असेल व आजोबा नातीच्या पोटी किंवा भाऊ बहिणीच्या पोटी जन्म घेण्याचे प्रकारही घडू शकतील. अशा व्यक्तिंचे आनुवंशिक गुण मूळ व्यक्तिंसारखे असतील व त्यात पूर्वकर्मबाधित आत्मे असण्याची शक्यता नाही.

या विवेचनावरून असे दिसून येईल की, जिवंत शरिर हा जिवंत पेशीचा एक संघ (System) आहे. ते जिवंत पेशीपासूनच उत्पन्न होते. या संघातील पेशींमध्ये बिघाड होऊन त्याची कार्यक्षमता नष्ट झाल्यास प्रथम या शरिराचे काही अवयव आणि नंतर सर्व शरिरच अकार्यक्षम म्हणजे मृत होते. यावेळी त्या शरिरामधून आत्मा नावाची निराळी वस्तु सुटी होत नाही. या दृष्टिने माणसाकडे पाहिल्यास तो कोठूनही आलेला नाही व कोठेही जाण्याकरता त्याला वेगळे अस्तित्वही नाही. त्याच्या नाशाबरोबर त्याचे व्यक्तित्व संपूर्ण नष्ट होते. हा जीवन प्रवाह मात्र त्याच्या संततिच्या रुपाने पुढे चालू रहातो. प्रत्येक व्यक्तिस मरणाबरोबर मोक्ष मिळतोच. पुनर्जन्म पूर्वकर्म व त्याचा चित्रगुप्ताने ठेवलेला हिशेब इत्यादि कल्पना निरर्थक आहेत.

पृथ्वी स्थिर असून स्वर्ग पृथ्वीच्यावर आकाशात कोठे तरी असतो आणि पाताळ खाली स्वर्गाच्या उलट दिशेला आहे ही आपली पूर्वापार समजूत आहे. विज्ञानामुळे आता लक्षात आले आहे की पृथ्वी दर सेकंदाला १८ मैल या वेगाने सूर्याभोवती फिरत आहे व सूर्य आपल्या संपूर्ण ग्रहमालेसह दर सेकंदास ३० मैल वेगाने धनू राशीतील एका ताऱ्याच्या दिशेने जात आहे. पृथ्वी अशा वेगाने अवकाशात फिरत असताना तिच्या वरच्या व खालच्या आकाशात स्वर्गलोक, पितृलोक, वैकुंठ अथवा पाताळ यासारखी ठिकाणे आहेत असे मानणे हा कल्पना-विलास आहे.

आपल्या तत्वज्ञानात मनुष्य जन्म फार दुर्मिळ व पूर्वपुण्याईने मिळणारा आहे असे सांगितले जाते. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची लोकसंख्या ३५ कोटी होती. ती आता १०० कोटी झाली आहे. हे कोट्यावधी नवीन पूर्वपुण्याई असलेले आत्मे कोठून आले ?

आपल्या तत्वज्ञानात गर्भवास हा पीडादायी असतो असे सांगितले आहे. विज्ञानामुळे आता गर्भाचे फोटो घेणे शक्य झाले आहे. गर्भाशयात अथवा गर्भात काही विकृती नसेल तर गर्भ सुखात असतो. हाताचा अंगठा चोखणाऱ्या स्मित



हास्य करणाऱ्या गर्भाचे फोटो उपलब्ध आहेत.

सारांश, मरणोत्तर आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व, पुनर्जन्म, कर्मसिध्दांत, चौऱ्यांशी योनीचे फेरे, भवसागरातून उध्दार, सद्‌गती, परलोक वास या कल्पना असत्य आहेत.

मग गीतेसारख्या महान ग्रंथात जे लिहिले ते खोटे आहे काय ? वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो की केवळ महान ग्रंथात लिहिले वा महान व्यक्तिने सांगितले म्हणून एखादी गोष्ट खरी असतेच असे नाही. बायबल मध्ये लिहिले आहे की पृथ्वी स्थिर आहे व सूर्य तिच्याभोवती फिरतो. पण हे खरे नाही. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सर्व मान्य झाले आहे. गीतेतील नैतिक मूल्यांना विरोध नाही. पण अज्ञानमूलक कल्पनाविलासावर आधारित नैतिक जीवनापेक्षा विवेकावर आधारित नैतिकता अधिक योग्य आहे.

मरणोत्तर अस्तित्व नाही याचा अर्थ असा नव्हे की मनुष्याने कसलीही पर्वा न करता मन मानेल तसे वागावे. मनुष्य हा समाजाचे एक अंग आहे. आपल्या स्वतःच्या व आपल्या आसपासच्या लोकांच्या व पर्यायाने समाजाच्या हिताकरता मनुष्याने निःस्वार्थीपणा, प्रामाणिकपणा, भूतदया व परोपकार यांचा अवलंब केलाच पाहिजे. कारण समाज टिकण्यासाठी व त्याचा उत्कर्ष होण्यासाठी असे वागणे आवश्यक आहे.

इतर प्राण्यातही समाज हित रक्षणाची ओढ दिसते. समाज हित विरोधी व स्वार्थीवृत्ती वाढत चालल्या तर तो समाज नष्ट होतो हे आपणास इतिहासावरून व काहीसे वर्तमानावरूनही कळते. पारलौकिक बुजगावण्यांचा अतिरेक समाजास अहितकारक ठरतो. त्यामुळे इथल्या व्यावहारिक नैतिक बाबींकडे दुर्लक्ष होते व समाज रक्षणास बाधा येते हे इतिहासात घडलेले आपण पाहतो.

शेवटी असे म्हणता येईल, इतरास पीडा न करता आपली, आपल्या कुटुंबियांची व समाजाची वैचारिक, आर्थिक सामुदायिक प्रगती कशी होईल यासाठी मनुष्याने प्रयत्नशील रहावे. जगाच्या रंगभूमीवर आपण एकच वेळ भूमिका करण्यास आलो आहोत. ती उत्तम रितीने आपल्या शक्तिनुसार पार पाडावी व आपली भूमिका संपताच काळाच्या पडद्यामागे अदृश्य व्हावे हेच जीवनाचे प्रयोजन !

(वरील लेखास विविध वृत्तपत्रांतून 'विज्ञान व अध्यात्मावर' प्रसिध्द झालेल्या लेखांचा आधार घेतला आहे.)

# परिशिष्ट – ब

## आत्मा असंभव का ?

विषाणूंचा अपवाद सोडला तर सगळे सजीव पेशींनी घडलेले असतात. त्यातले कित्येक एकपेशीय असतात. उदाहरणार्थ अमिबा. बाकीच्यांची शरिरे अनेक पेशींनी बनलेली असतात. माणसाच्या शरिरात एकावर चौदा शून्ये एवढ्या पेशी असतात. प्रत्येक पेशी जिवंत असते. स्वतंत्रपणे जगू शकते, वाढू शकते, विभागू शकते. एखाद्या प्राण्याच्या एखाद्या अवयवातील पेशी घेऊन त्या प्रयोगशाळेत वाढवता येतात व नवा प्राणी निर्माण करता येतो. म्हणून जिवंतपणाच्या अभ्यासासाठी पेशी हे एकक धरून संशोधन करावे लागेल.

## पेशीच्या जिवंतपणासाठी बाहेरून आत्मा प्रवेश करतो का ?

जीवशास्त्र व भौतिकशास्त्र यातील संशोधनाचा आधार घेतला तर पेशीमधील जिवंतपणाला आत्म्याची गरज नाही असाच निष्कर्ष निघतो. पेशीमधील सर्वप्रकारची कार्ये व प्रक्रिया ही भौतिकी व रसायनशास्त्राच्या नियमांनुसारच चालतात. यासाठी ज्ञात विज्ञान नियमाखेरीज दुसऱ्या कोणत्याही शक्तिची गरज भासत नाही. पेशींमध्ये चालणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रक्रिया प्रयोगशाळेत परिक्षानलिकेत जिवंत पेशीविना, केवळ रासायनिक भौतिक क्रियांद्वारे दाखवता येतात. पण याबाबत एक प्रश्न उपस्थित होतो.

पेशींमधल्या सर्व प्रकारच्या प्रक्रियेंचे नियंत्रण कसे होते ? त्यात सुसूत्रता कशी येते ? निर्जीव घटकापासून एखादी जिवंत पेशी तयार करता आली तर आत्म्याच्या अस्तित्वाचा प्रश्न आपोआपच निकालात निघेल पण अशी पेशी तयार करणे अद्याप साधलेले नाही. पण येत्या एक दोन शतकात माणूस जिवंत पेशी तयार करू शकेल याची खात्री वाटते. प्रश्न फक्त तंत्रज्ञान या अवस्थेपर्यंत विकसित होण्याचा आहे. या संदर्भात आतापर्यंत जे संशोधन झाले आहे, त्याचा मागोवा घेतला तर आपणांस हे स्पष्ट होईल.

आपण पाणी तापवत गेलो तर पाण्याचे रेणू अधिक गतिमान होतात हे आपण पहातो. कोणत्याही पदार्थाचे तापमान जितके जास्त तितकी त्या पदार्थामधील अणुरेणूंची सरासरी गति अधिक. पदार्थाचे तापमान कमी करत गेल्यास त्याच्यातील रेणूंची हालचाल मंदावत जाते. एक अवस्था अशी येते की त्या अवस्थेत रेणूंच्या हालचाली पूर्णपणे थांबतात. हे ज्या तापमानाला घडते त्यास शून्य अंश निव्वळ



तापमान (Absolute zero) म्हणतात. सेंटीग्रेडमध्ये हे तापमान -273$^0$C इतके असते.

एखादी जिवंत पेशी शून्य अंश निव्वळ तापमानापर्यंत गोठवली तर तिच्यातील सर्व हालचाली म्हणजेच प्रक्रिया या पूर्णपणे थांबतील. मात्र त्या पेशींची रचना तशीच राहील. एखादे घड्याळ बंद पडले तर त्यातील विविध भागांची अंतर्गत मांडणी तशीच रहाते. त्याप्रमाणेच पेशीरचना कायम राहील.

द्रवरुप हेलियमच्या सहाय्याने जिवंतपेशी दोन अंश निव्वळ तापमानापर्यंत गोठविता येते. या तापमानाला पेशीतील हालचाल जवळजवळ पूर्णतः थांबते. अशी पेशी नक्कीच मरतील असे वाटते. पण हीच पेशी ऊब देऊन नेहमीच्या तापमानाला आणली तर ?

असे प्रयोग झालेत. अशी पेशी पूर्ववत जिवंत पेशीप्रमाणे वागू लागते. याबाबत असे म्हणता येईल काय की ही पेशी कोणत्या तरी आत्मा नामक बाह्यशक्तीमुळे पुन्हा जिवंत झाली ? याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. त्यासाठी पेशी ही एक रचना आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

कोणत्याही सजीवाची वा यंत्राची रचना व कार्य ही अविभाज्य अंगे असतात. कार्य चालू नसेल तर रचना असतेच. (घड्याळ चालू नाही पण घड्याळाची रचना बदलत नाही) आता घड्याळ बंद का पडते ? म्हणजे त्यातील विविध भागाच्या हालचाली पूर्णपणे का थांबतात ? तर त्यातील सेल संपला म्हणून म्हणजे उर्जा पुरवठा थांबवला. आता घडयाळ्यात नवीन सेल बसविला की घड्याळ पूर्ववत चालू होते. याला कारण घड्याळात विशिष्ट रचना असते हेच होय. तद्वत पेशीला उर्जा दिली की पेशीच्या विशिष्ट रचनेमुळे उर्जा पेशींमध्ये विविध भागात धावते (जसा वीजप्रवाह रेडीओमध्ये विविध भागात धावतो) व पेशीची हालचाल सुरु होते.

पेशी ज्या अणुंची बनलेली आहे ते सर्व सुटे अणु पेशीप्रमाणे २ अंश निव्वळ तापमानाला रचून व सांधून ठेवले व नंतर त्यास उष्णता दिली तर जिवंत पेशी तयार होईल. हा प्रयोग भविष्यात घडू शकेल. यासाठीची पेशीरचनेची माहिती व तंत्रज्ञान मिळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रयत्न जेव्हा यशस्वी होईल तेव्हा आत्मा ही कल्पना निकालात निघेल.

पेशीची रचना बदलली तर पेशीचे गुणधर्म बदलतात. जेनेटीक तंत्रज्ञानाने अनुवंशिक आजारावर मात करणे शक्य झाले आहे. याचा अर्थ असा की, माणसाचे पूर्वकर्म आता निकालात निघू शकेल. कर्म विपाकाचा सिध्दांतही सोडून द्यावा

लागेल व या सिध्दांताचा आधार जो आत्मा तो मानन्याचे कारण उरणार नाही.

जिवंतपणासाठी आत्म्याची गरज नाही म्हणजे आत्मा अस्तित्वातच नाही असे सिध्द होत नाही. पण भौतिक नियमात बसू शकत नाही असा आत्मा शक्य नाही हे दाखवता येईल. प्राण्यांच्या शरीरातील सर्व प्रकारच्या क्रिया या भौतिक आहेत. उदा. हृदयाची स्पंदने किंवा मेंदूतून निघणारे विद्युत रासायनिक संदेश इ. या क्रिया सुरु करणे, बंद करणे वा त्यांची दिशा बदलणे यासाठी जोर (Force) लावणे आवश्यक आहे. जोर लावणे ही भौतिक क्रिया स्वतः भौतिक नसलेला आत्मा कसा करणार ?

भुतांच्या गोष्टीमध्ये वा सिनेमामध्ये एखादे भूत भिंतीतून आरपार येते आणि टेबलावरचा खंजीर उचलून व्यक्तिच्या पोटात खुपसते असे चित्रण केले जाते. आता भिंतीतून आरपार जाण्याचा गुणधर्म जर त्या भूतात असेल तर त्याची बोटे ही पोटातून आरपार नाही का जाणार ? म्हणून भूत नामक दुष्टात्मा कल्पोकल्पित आहे. म्हणून आत्मा जर भौतिक नसेल तर त्याला भौतिक घटनांचे नियंत्रण करता येणार नाही. जर तो भौतिक गोष्टींचे नियंत्रण करत असेल तर त्याला भौतिक शक्ति वापरावीच लागेल. ही शक्ति प्रयोगाने मोजता येईल. म्हणजे आत्मा भौतिक किंवा जड ठरेल.

संदर्भ - आत्मा हवा कां ? - मिलींद वाटवे
(आजचा सुधारक - जानेवारी-फेब्रुवारी २००४)



## अंधश्रद्धा निर्मूलनावरील इतर प्रकाशकांची पुस्तके

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १. | ऐसे कैसे झाले भोंदू | १५० |
| २. | लढे अंधश्रद्धेचे-१ | ५० |
| ३. | लढे अंधश्रद्धेचे-२ | ५० |
| ४. | लढे अंधश्रद्धेचे-३ | ५० |
| ५. | भ्रम आणि निरास | ५० |
| ६. | विचार तर कराल | ७० |
| ७. | अंधश्रद्धा-प्रश्नचिन्ह-पूर्णविराम | ३५ |
| ८. | श्रद्धा-अंधश्रद्धा | ५० |
| ९. | अंधश्रद्धा विनाशाय | ७५ |
| १०. | ठरलं.... डोळस बनायचय | ५० |
| ११. | संत तुकारामाचे अभंग | १० |
| १२. | गाणी-अंधश्रद्धा निर्मूलनाची | १२ |
| १३. | वयात येताना | ४५ |
| १४. | हे मला माहित असायला हवं | ६० |
| १५. | महाभारतातील स्त्रिया | ५० |
| १६. | वादळ अंधश्रद्धेचे | ४० |
| १७. | प्रथा अशी न्यारी | ४० |
| १८. | देवदासी प्रथा आणि नग्नपुजा | ७५ |
| १९. | अनिष्ट प्रथा | ४० |
| २०. | विद्रोही तुकाराम | १०० |
| २१. | धर्म की धर्मा पलीकडे | ७० |
| २२. | आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल | १५० |
| २३. | कुंभमेळा - सांधूचा की संधीसांधूचा | ५० |